




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६









मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ११८ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


## पीडित महिलांच्या चित्रफिती समाज माध्यमावर प्रसारित करणाऱ्या

# तिघांविरुद्ध गुन्हा, दोघांना अटक

### भोंदूबाबा अशोक खरात अत्याचार प्रकरण



**राहाता : (समर्थ गांवकरी)**

राज्यभर खळबळ उडवणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरात याने लैंगिक अत्याचार केलेल्या गुन्ह्यातील पीडित महिलांच्या अश्लील चित्रफिती समाज माध्यमावर प्रसारित करणाऱ्या तिघांविरुद्ध कोपरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यातील दोघांना अहिल्यानगर पोलिसांनी अटक करण्यात आली आहे. एकाचा शोध पोलिस घेत आहेत. भोंदूबाबा अशोक खरात याच्याविरुद्ध दाखल गुन्ह्यांचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. राहुल गंगाधर शिंदे (रा. कोपरगाव) व योगेश पंढरीनाथ आढाव (रा. कोपरगाव) या दोघांना अटक करण्यात आली तर तिसरा आरोपी बीड जिल्ह्यातील आहे. त्याचा शोध सुरू आहे.

भोंदूबाबा अशोक खरात याच्याविरुद्ध महिलांवरील अत्याचाराचे नाशिकमधील सरकारवाडा पोलीस ठाण्यात विविध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याचा तपास विशेष तपास पथकाकडून सुरू आहे. या गुन्ह्यातील पीडित महिलांच्या अश्लील चित्रफिती कोपरगावमधील 'बीएमडब्ल्यू' या व्हाट्सअप ग्रुपवर राहुल शिंदे याने प्रसारित केल्या. नंतर या चित्रफीती योगेश आढाव याने बीड जिल्ह्यातील तरुणाला पाठवल्या, असे तपासात निष्पन्न झाले आहे.

यावरून तिघांविरुद्ध कोपरगाव पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संवेदनशील व गंभीर गुन्ह्यात अनेक महिला पीडित असण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने त्यांची ओळख उघड होणार नाही, याची खबरदारी घेऊन तपास करण्यात येत आहे. अशा परिस्थितीत कोणाकडेही पीडित महिलेची ओळख, तिच्या नातेवाईकांची ओळख, तिच्या घराची ओळख, तिच्या कुटुंबीयांची ओळख उघड होईल अशा चित्रफिती असल्यास त्यांनी त्या काळ नष्ट कराव्यात व प्रसारमाध्यमावर प्रसारित करू नये, असे आवाहन विशेष तपास पथकाने केले आहे. अशा ओळख उघड होणाऱ्या चित्रफिती प्रसारित केल्यास संबंधितांवर व प्रसारमाध्यमाच्या 'ग्रुप ॲडमिन'वर गुन्हा दाखल करण्यात येऊन त्यांना अटक करण्याची कायदेशीर कारवाई केली, जाईल असेही विशेष तपास पथकाने पत्रकात नमूद केले आहे.

### भोंदूगिरीचा आणखी एक चेहरा

स्वतःला शंकर म्हणवून घेत "मी शंकर तू माझी पार्वती आहेस" असे सांगत एका महिलेवर बलात्कार करणाऱ्या ऋषिकेश वैद्य याच्याविरुद्ध वसईच्या माणिकपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिलेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी तात्काळ पावले उचलली असून, पुढील कायदेशीर कारवाईसाठी हे प्रकरण पुण्यातील मांजरी पोलिसांकडे वर्ग करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील 35 वर्षीय पीडित महिलेची 2023 मध्ये फेसबुकच्या माध्यमातून वसईतील 'आमची वसई' संस्थेचा प्रमुख आणि स्वयंघोषित धर्मगुरू ऋषिकेश वैद्य याच्याशी ओळख झाली होती. वैद्य याने महिलेच्या धार्मिक वृत्तीचा गैरफायदा घेत अध्यात्म शिकवण्याच्या बहाण्याने जवळीक साधली आणि डिसेंबर 2023 मध्ये पुण्यात तिची भेट घेतली. यावेळी आपण 'महादेवाचा अवतार' असून 'तू माझी पार्वती आहेस' असे भासवून त्याने महिलेला भुलवले आणि पुण्यातील मांजरी येथील एका लॉजमध्ये नेऊन तिला गुंगीकारक पदार्थ देऊन तिच्यावर अत्याचार केला.

## थोडक्यात...

### अवकाळी गारांच्या पावसाची हजेरी

कणकवली (समर्थ गांवकरी) : सावंतवाडी – गेल्या काही दिवसांपासून असह्य उन्हाच्या झळांनी हैराण झालेल्या कणकवलीकरांना आज अखेर निसर्गाने दिलासा दिला आहे. गुरुवारी दुपारी 3 वाजण्याच्या सुमारास वातावरणात अचानक बदल होऊन गारांच्या पावसाने जोरदार हजेरी लावली. या अवकाळी पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असला, तरी आंबा-काजू बागायतदारांची मात्र चिंता वाढली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या तापमानात लक्षणीय वाढ झाली होती. दुपारच्या वेळी कडक उन्हामुळे नागरिक उकाड्याने त्रस्त झाले होते. आज सकाळपासूनही उन्हाचा तडाखा कायम होता. मात्र, दुपारी 3 वाजल्यानंतर अचानक वाऱ्याचा वेग वाढला आणि आकाशात काळे ढग दाटून आले. काही वेळातच विजांच्या कडकडाटासह पावसाला कणकवलीत सुरुवात झाली. या पावसामुळे तापमानात घट झाली असून नागरिकांना उष्म्यापासून मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, दुसरीकडे हा पाऊस बागायतदारांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. सध्या आंबा आणि काजूचा हंगाम सुरू असल्याने या अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### पेट्रोल-डिझेलचा मुबलक साठा

मुंबई (समर्थ गांवकरी) : सोशल मीडियावर पेट्रोल-डिझेल तुटवड्यासंदर्भात जे अफवा पसरवीत आहेत, त्यांच्यावर गुन्हे दाखल करणार, असा इशारा मंत्री गिरीश महाजन यांनी दिला आहे. इराण-अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यात गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्यानंतर गॅस एजन्सीच्या बाहेर लोकांनी रांगा लावल्याचे पाहायला मिळाले होते. आता पेट्रोल-डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्याने नागरिकांनी पेट्रोल पंपावर गर्दी करण्यास सुरुवात केली आहे. मात्र तुटवडा नसल्याचे सरकारकडून स्पष्ट करण्यात येत आहे. गिरीश महाजन म्हणाले, इंधन पुरवठ्यासंदर्भात जगभरात अशीच परिस्थिती आहे, पण आपण संयम बाळगावा. करमर्शियल गॅस बाबतीत शॉर्टेज आहे, घरगुती बाबतीत नाही. भारतात रॉकेल आले असून त्याचा वापर करून आपली गरज भागवू शकतो. तसेच सोशल मीडियावर पेट्रोल-डिझेल तुटवड्यासंदर्भात जे अफवा पसरवत आहेत, त्यांच्यावर गुन्हे दाखल करणार असल्याचा इशाराही महाजन यांनी दिला आहे.

## वाहनांच्या भल्यामोठ्या रांगा, टू व्हिलरला २०० चे पेट्रोल

# छत्रपती संभाजीनगरातल्या पेट्रोल पंपांवर तोबा गर्दी



**छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात लॉकडाऊन लागू होणार असल्याची अफवा वाऱ्यासारखी पसरताच पेट्रोल पंपांवर वाहनधारकांची अक्षरशः झुंबड उडाली आहे. 'उद्या पेट्रोल मिळणार नाही' या भीतीने नागरिकांनी मोठ्या प्रमाणात पेट्रोल-डिझेल भरण्यासाठी रांगा लावल्यात. शहरातील सर्वच पेट्रोल पंपांवर दोन दिवसांपासून लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहे. या अचानक वाढलेल्या गर्दीमुळे अनेक ठिकाणी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. पंपावर काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याने सांगितले, "इंधनाचा कोणताही तुटवडा नाही, पण लोक अफवांवर विश्वास ठेवून एकाच वेळी गर्दी करत आहेत. त्यामुळे व्यवस्थापन करणे कठीण जात आहे." दुसरीकडे तेल कंपन्यांनी आता ॲडव्हान्स रक्कम घेणे सुरू केले आहे. त्यामुळेही पेट्रोल उशिरा येत असल्याचे समजते. या साऱ्या गोंधळामुळे नागरिकांमध्ये मात्र संतापाचे वातावरण दिसून आले. एका वाहनधारकाने प्रतिक्रिया देताना म्हटले, "सरकारने आधी स्पष्ट माहिती द्यायला हवी. अफवा पसरतात कारण अधिकृत माहिती वेळेवर मिळत नाही." तर दुसऱ्या एका नागरिकाने सांगितले की, "आम्हाला खात्री नाही उद्या काय होईल, म्हणून आजच पेट्रोल भरून घेतोय." तेल कंपन्यांनी व्यवहाराची पद्धत बदलली आहे. यापूर्वी पेट्रोल पंपचालक आधी तेल घ्यायचे. त्यानंतर पैशाचा भरणा होत असे. मात्र, आता अमेरिका-इराण युद्ध सुरू झाले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर इंधन प्रश्न निर्माण झाला. हे पाहता तेल कंपन्यांनी ॲडव्हान्स रक्कम घेणे सुरू केले. मात्र, पेट्रोल पंपचालक ॲडव्हान्स रक्कम देत नाहीत. त्यामुळे त्यांना पेट्रोल मिळत नसल्याचे समोर आले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात सुट्ट्या पेट्रोल व डिझेल विक्रीवर बंदी

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

समाज माध्यमांवर पेट्रोल व डिझेल तुटवड्या संदर्भात पसरत असलेल्या अफवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी व सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्ह्यात सुट्ट्या पेट्रोल व डिझेल विक्रीवर बंदी घातली आहे. या देशानुसार कॅन, बाटली किंवा डब्यात पेट्रोल व डिझेल देण्यावर निर्बंध लादण्यात आले आहेत. याशिवाय अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालकांनी पेट्रोल व डिझेल केवळ वाहनांच्या इंधन टाकीतच भरावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कोणत्याही परिस्थितीत पेट्रोल किंवा डिझेलची खुल्या स्वरूपात म्हणजेच प्लास्टिक, बाटली, कॅन, डबा किंवा कोणत्याही भांड्यात विक्री करू नये अशी सक्त आदेश देण्यात आले आहेत. यासोबतच पेट्रोल पंप परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा प्रशासनाने कार्यरत ठेवावी, इंधन विक्रीच्या नोंदी नियमित ठेवणे बंधनकारक केले आहे. या आदेशाचे काटेकोर पालन करण्याची



संपूर्ण जबाबदारी संबंधित पेट्रोल पंप मालक आणि व्यवस्थापक यांची राहील, जे कोणी या नियमांचे उल्लंघन करतील त्यांच्यावर पेट्रोलियम नियम २००२, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील तरतुदीनुसार दंडात्मक व फौजदारी स्वरूपाची कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिला आहे. याशिवाय सर्व पेट्रोलियम कंपन्यांच्या व्यवस्थापकांना जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवर इंधनाचा पुरेसा साठा राहील याची दक्षता घेण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

युद्धाच्या पार्श्वभूमीवर समाज माध्यमांवर पेट्रोलवर डिझेलच्या तुटवड्याबाबत अफवा पसरवल्या जात आहेत त्यातून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे राखण्याचे व सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने पेट्रोलियम नियम २००२ मधील तरतुदींचा आधार घेत, हे आदेश तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यापूर्वीच समाज माध्यमांवर इंधन तुटवण्याच्या अफवा पसरवल्यास गुन्हे दाखल करण्याचे आदेश पोलिसांना दिले आहेत.

जिल्ह्यात गेल्या तीन चार दिवसांपासून इंधन तुटवड्याच्या अफवा समाज माध्यमावर पसरवल्या जात आहेत. त्यातून पेट्रोल पंपांवर वाहन चालक गर्दी करू लागले आहेत. वाहनचालकांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. जिल्हा प्रशासनाकडून जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व एलपीजी गॅसचा पुरेसा साठा असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र तरीही पेट्रोल पंपावरील गर्दी थांबलेली नाही. वाहन चालक पेट्रोल, डिझेलचा अतिरिक्त साठा करू लागले आहेत. त्यातून मिळेल त्या साधनांमध्ये पेट्रोल, डिझेल वाहनचालक घरी घेऊन जाताना दिसत आहेत.




# इराणी लढवय्ये म्हणून कमकुवत, पण वाटाघाटींमध्ये उत्तम

### डोनाल्ड ट्रम्प यांचं मोठं वक्तव्य

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमध्ये मागील काही दिवसांपासून युद्ध सुरू आहे. या युद्धात आतापर्यंत इराणचं मोठं नुकसान झालं आहे. इराणच्या काही नेत्यांचा आणि लष्कराच्या प्रमुख अधिकाऱ्यांचा या युद्धात मृत्यू झाला, तरीही हे युद्ध अद्याप थांबलेलं नाही. पण आता हे युद्ध थांबवण्यासाठी पावलं उचलण्यात येत आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हे युद्ध थांबवण्याच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानच्या मध्यस्थीने इराणसमोर १५ कलमी शांतता प्रस्ताव ठेवला. मात्र, अमेरिकेचा हा प्रस्ताव इराणने गुरुवारी पुन्हा एकदा फेटाळून लावला. 'अमेरिकेचा हा प्रस्ताव एकतर्फी आणि अन्यायकारक असून केवळ अमेरिका-इस्रायलच्या हिताचा आहे', असं इराणने म्हटलं आहे.

दरम्यान, इराणने अमेरिकेचा शांतता प्रस्ताव फेटाळून लावल्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. 'इराणी लढवय्ये म्हणून कमकुवत आहेत, पण वाटाघाटींमध्ये उत्तम आहेत', असं वक्तव्य डोनाल्ड ट्रम्प यांनी केलं आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला लढाऊ दृष्ट्या कमकुवत, पण वाटाघाटींमध्ये उत्तम असल्याचं म्हटलं आहे. तसेच इराण वाटाघाटींसाठी दबाव आणत असल्याचा दावा करत अमेरिका राजनैतिक तोडगा काढण्यास उत्सुक असल्याचं वृत्त फेटाळून लावलं आणि हा दबाव तेहरानकडून येत असल्याचं भाष्य केलं. डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, "ते (इराण) करार करण्यासाठी विनवणी करत आहेत, आम्ही नाही. संघर्ष चौथ्या आठवड्यात पोहोचला असताना अमेरिका नव्हे तर इराणच वाटाघाटी पुन्हा सुरू करू पाहत आहेत, असं ते (इराण) बोलत आहेत हे कोणालाही कळेल. ते मूर्ख नाहीत, खरं तर एका अर्थाने ते खूप हुशार आहेत आणि ते उत्तम वाटाघाटी करणारे आहेत. मी तर म्हणेन की, ते (इराण) लढवय्ये म्हणून कमकुवत आहेत. पण वाटाघाटींमध्ये उत्तम वाटाघाटी करणारे आहेत", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.



### शांतता चर्चेसाठी पाकिस्तानची मध्यस्थी

अमेरिका आणि इराणमध्ये शांतता चर्चा घडवून आणण्यासाठी पाकिस्तानने पुढाकार घेतला आहे. यासाठी शाहबाज शरीफ यांनी एक पोस्ट देखील एक्सवरुन केली होती, त्याचा स्क्रिनशॉट खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या अधिकृत एक्स खात्यावरुन शेअर केला. आता या चर्चेतून दोन्ही देशांतील संघर्ष समाप्त होणार की दोन्ही देशांनी मांडलेल्या अटींवरुन या चर्चा फिसकटणार याकडे सर्व जगाचं लक्ष लागलं आहे.




# भोकर येथे दक्षता व नियंत्रण समितीच्या बैठकीत अट्रॉसिटी कायदा अंमलबजावणीतील समस्यांवर चर्चा

**भोकर : (समर्थ गांवकरी)**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनजागृतीचा अभाव, कायद्याबाबतचे समज-गैरसमज आणि पीडितांना मदत मिळण्यात होणारा विलंब या प्रमुख समस्या असल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर उपविभागीय दक्षता व नियंत्रण समितीच्या आढावा बैठकीत विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.




उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली दि. २३ मार्च रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय भोकर येथे ही बैठक पार पडली. बैठकीस प्रशिक्षणार्थी तहसीलदार अभयराज नंजुंडे, पोलीस विभागाचे प्रतिनिधी म्हणून पो.उप.नि. संभाजी हनमंते, गटविकास अधिकारी माधव केंद्रे, शेखर देशमुख, नायब तहसीलदार काशिनाथ डांगे तसेच समितीचे अशासकीय सदस्य एल.ए. हिरे, उत्तम बाबळे, शिवाजी देवतुळे आदी उपस्थित होते. बैठकीत समिती सदस्य उत्तम बाबळे यांनी कायद्याबाबत सर्वसामान्यांमध्ये योग्य समज नसल्याने अनेक गैरसमज पसरत असल्याचे सांगितले. तर एल.ए. हिरे यांनी हा कायदा लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी व्यापक जनजागृतीपर मेळावे आयोजित करण्याची गरज व्यक्त केली. या मागणीस शिवाजी देवतुळे यांनी अनुमोदन दिले. यावर अध्यक्ष प्रवीण मेंगशेट्टी यांनी जनजागृती कार्यक्रमांसंदर्भात प्रस्ताव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे पाठविण्याच्या सूचना दिल्या. तसेच कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. दरम्यान, उपविभागात एकूण १० प्रकरणे तर भोकर पोलीस ठाणे हद्दीत ४ प्रकरणे दाखल असून पीडितांना शासकीय अनुदान मिळण्यासाठी कार्यवाही सुरू असल्याची माहिती पो.उप.नि. संभाजी हनमंते यांनी दिली. एकूणच, कायद्याबाबत जागरूकता वाढवणे, गैरसमज दूर करणे आणि पीडितांना तातडीने न्याय व मदत मिळवून देणे हीच सध्याची प्रमुख गरज असल्याचे बैठकीत स्पष्ट झाले.

# अंकिता पाटील ठाकरे यांनी पुणे येथे घेतली जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची भेट

■ घरकुलास जागा देणे संदर्भात केली चर्चा

**इंदापूर : (समर्थ गांवकरी)**




इंदापूर तालुक्यामध्ये गावोगावी अनेक बेघर कुटुंबांना घरकुले मंजूर झाली आहेत, मात्र त्यांचेकडे स्वतःची जागा नसल्याने सदरची घरकुले अद्यापी प्रलंबित आहेत. त्यामुळे जागा नसलेल्या घरकुल लाभार्थ्यांना शासनाकडून जागेसाठी गायरान व गावठाणातील जागा देणे संदर्भात आवश्यक सर्व प्रशासकीय प्रक्रिया गतीमान करणेसंदर्भात पुणे जिल्हा परिषदेच्या सदस्या अंकिता पाटील ठाकरे यांनी पुणे येथे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांची बुधवारी (दि. 25) भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. गरीब व वंचित कुटुंबांना स्वतःचे हक्काचे घर मिळावे, हा सर्वांचा प्रामाणिक प्रयत्न आहे. त्यामुळे घरकुल मंजूर झालेल्या बेघर कुटुंबांना पर्यायी जागा उपलब्ध होणे गरजेचे असून, ही बाब अत्यंत संवेदनशील असून संबंधित कुटुंबांच्या मूलभूत हक्कांशी निगडित आहे, असे अंकिता पाटील ठाकरे यांनी यावेळी नमूद केले. समाजातील शेवटच्या गरीब घटकापर्यंत विकासाची गंगा पोहोचली पाहिजे, हे आपले सर्वांचे उद्धीष्ठ असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी या संदर्भात गांभीर्याने दखल घेत तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले असून, लवकरात लवकर पात्र लाभार्थ्यांना घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देणे संदर्भात कार्यवाही केली जाईल, असे स्पष्ट केले. या भेटीप्रसंगी जिल्हा परिषद सदस्या निर्मलाताई मिसाळ, सागर मिसाळ उपस्थित होते.

# अकोलेत रंगणार शिक्षक क्रिकेट स्पर्धेचा महासंग्राम

## गटशिक्षणाधिकारी अरविंद कमवत यांची संकल्पना

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुका पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत यांच्या संकल्पनेतून अकोले तालुक्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांसाठी अकोले एज्युकेशन प्रीमिअर लीग चे आयोजन शनिवार दिनांक २८ मार्च २०२६ ते रविवार २९ मार्च २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे.




अकोले तालुका शिक्षक क्रिकेट स्पर्धेचे हे दुसरे वर्ष असून यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक,माध्यमिक-उच्चमाध्यमिक शिक्षक तसेच आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा सहभाग असणार आहे.प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या संघास १५०००/- रुपये व सन्मानचिन्ह ,द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या संघास ११०००/- रुपये व सन्मान चिन्ह तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या संघास ७०००/- रुपये व सन्मान चिन्ह आणि चतुर्थ क्रमांक मिळविणाऱ्या संघास ५०००/- रुपये व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. उत्कृष्ट खेळ करणाऱ्या खेळाडूंना वैयक्तिक बक्षिसे दिले जाणार आहेत. गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत यांनी या स्पर्धा मागील वर्षांपासून अकोले तालुक्यात सुरू केलेल्या आहेत.शिक्षकांना दररोजच्या कामातून विरंगुळा मिळावा,शिक्षकांमध्ये एक सांघिक भावना निर्माण व्हावी,शारीरिक आरोग्य सुदृढ रहावे,सहकार्याची भावना वाढीस लागावी व शिक्षकांचा आत्मविश्वास वाढावा हा हेतू डोळ्यासमोर ठेऊन या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले जात आहे.ही संकल्पना अहिल्यानगर जिल्ह्यात अकोले तालुक्यात प्रथम गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत यांच्या माध्यमातून राबविली जात असल्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.या स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी सर्व क्रिकेट प्रेमींनी २८ मार्च व २९ मार्च रोजी आय टी आय मैदान अकोले येथे उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अध्यक्षपदी डॉ. सादेख पठाण

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड शहरातील प्रख्यात वैद्यकीय तज्ज्ञ डॉ.सादेख जानमोहम्मद पठाण यांची रोटरी क्लब ऑफ जामखेडच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. नव्या कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी प्रफुल सोळंकी, सचिवपदी अरुण उगले, कोषाध्यक्षपदी विकास पवळ यांची निवड झाली आहे. सल्लागार म्हणून डॉ. प्रशांत गायकवाड, इव्हेंट मॅनेजमेंट प्रमुख मयूर भोसले, प्रसिद्धी प्रमुख धनराज पवार, आरोग्य व महिला प्रतिनिधी डॉ. विद्या तोंडे यांच्यासह कार्यकारी सभासद म्हणून डॉ. सुशिल पन्हाळकर, डॉ. विकी दळवी, संभाजी मुळे व विजय पवार यांचीही निवड झाली आहे. डॉ. पठाण यांचा जन्म सामाजिक व राजकीय पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबात झाला असून त्यांचे बालपण नाळवंडी व डोंगरकिन्ही या ग्रामीण भागात गेले.

# 'इन्स्पायर्ड' उपक्रमातून टीच फॉर इंडियाचे पुण्यात १६ वर्ष पूर्ण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

टीच फॉर इंडिया पुणेने 'इन्स्पायर्ड' (InspirED) या कम्युनिटी इव्हेंटद्वारे शहरातील आपल्या १६ वर्षांच्या कार्याचा गौरव साजरा केला. पुणे इंटरनॅशनल सेंटर येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात फेलोज, माजी विद्यार्थी, देणगीदार, सहयोगी संस्था आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.


शिक्षण क्षेत्रात योगदान अधोरेखित

या कार्यक्रमाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेण्यात आला, तसेच वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या पुढील वाटचालीवर चर्चा करण्यात आली. टीच फॉर इंडिया पुणे महानगरपालिकेसोबत सहयोगाने काम करत असून, महानगरपालिका शाळांमध्ये शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विविध उपक्रम राबवत आहे. दिवसभर चाललेल्या या इव्हेंटमध्ये टीच फॉर इंडियाच्या फेलोशिप पूर्ण केलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली अनेक संवादात्मक शैक्षणिक सत्रांचे आयोजन करण्यात आले. पुण्यातील सुमारे ३० शिक्षण संस्थांनीही सहभाग घेत आपले नाविन्यपूर्ण उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी केलेले प्रयत्न सादर केले. टीच फॉर इंडिया फेलोशिप अंतर्गत तरुण व्यावसायिक आणि पदवीधरांना दोन वर्षांसाठी महानगरपालिका व कमी उत्पन्न गटातील शाळांमध्ये शिक्षक म्हणून काम करण्याची संधी दिली जाते. या माध्यमातून अनुभवाधारित शिक्षण, विचारक्षमतेचा विकास आणि मूल्याधारित शिक्षणाला चालना दिली जाते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांचे नाटक, संगीत आणि सर्जनशील सादरीकरण हे विशेष आकर्षण ठरले. या सादरीकरणातून विद्यार्थ्यांमध्ये विकसित झालेला आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण स्पष्टपणे दिसून आला. टीच फॉर इंडिया पुणेच्या सिटी डायरेक्टर दीपिका गुलेरिया म्हणाल्या, "गेल्या काही वर्षांत आमच्या विद्यार्थ्यांनी फर्ग्युसन कॉलेज, सिम्बायोसिस आणि कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे यांसारख्या नामांकित संस्थांमध्ये प्रवेश मिळवला आहे.

तसेच काही विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील यशही मिळवले आहे." त्या पुढे म्हणाल्या, "इन्स्पायर्ड हा उपक्रम प्रत्येक मुलासाठी शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी समुदायाच्या एकत्रित शक्तीचे उदाहरण आहे. विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, आत्मविश्वास आणि नेतृत्व विकसित केल्यास ते स्वतःचे भविष्य घडवू शकतात."

# मिरजगाव येथे श्रीराम नवमी उत्साहात साजरी

## श्रीराम नवमी जन्मोत्सव समितीच्या वतीने धार्मिक व सामाजिक उपक्रम





**मिरजगाव : (समर्थ गांवकरी)**

कर्जत तालुक्यातील मिरजगाव शहरातील मुंजोबा चौक येथे श्रीराम नवमीनिमित्त श्रीराम जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात आणि धार्मिक व सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला.

गुरूवारी, २६ मार्च रोजी श्रीराम नवमी निमित्ताने प्रभू श्रीराम यांच्या भव्य अशा मूर्तीला पुष्पहार अर्पण करून दुपारी १२ वा. मूर्तीपूजन करुन महाआरती करण्यात आली.

मिरजगाव शहरातील मुंजोबा चौक याठिकाणी श्रीराम नवमी उत्सव समिती यांच्या वतीने श्रीराम जन्मोत्सव सोहळा सालाबादप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी, सर्व क्षेत्रातील मान्यवर, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रंगीबेरंगी फुलांच्या आकर्षक कमानी, श्रीरामाचा जयघोष झाला अन् 'राम जन्मला गं सखी, राम जन्मला', 'सियावर रामचंद्र की जय... पवनसुत हनुमान की जय... प्रभू रामचंद्र भगवान की जय'... अशा जयघोषाने यावेळी मिरजगाव शहर व परिसर दुमदुमदून गेला होता. तर परिसरात आकर्षक अशी रांगोळी काढण्यात आली होती.

श्रीराम जन्मोत्सव सोहळा झाल्यानंतर परिसरात फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करण्यात आली. तसेच यावेळी रामाच्या मूर्तीवर पुष्पवृष्टीही करण्यात आली. यावेळी मुंजोबा चौकात रामभक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. श्रीराम नवमी जन्मोत्सव समिती, मुंजोबा चौक यांच्या वतीने इतर खर्चाला फटा देत सामाजिक बांधिलकी जोपासत येथील शिवतीर्थ महादेव मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी ११ हजार १११ रूपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी रामभक्त, भाविक, नागरिकांना उत्सव समितीकडून मिठाई वाटप करून शिंपी आमटी - चपाती व गोड शिरा हा महाप्रसाद देण्यात आला. तसेच मुंजोबा चौकात सायंकाळी ६ वाजता 'श्रीराम दरबार' कार्यक्रम हा प्रभू श्रीरामांच्या आदर्श जीवनावर, आणि रामराज्याच्या संकल्पनेवर आधारित एक पवित्र धार्मिक सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी आयोजक समितीचे सर्व पदाधिकाऱ्यांनी व रामभक्तांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी मिरजगाव पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता..

# 'श्रीराम नवमी' साजरी

**मिरजगाव : (समर्थ गांवकरी)**

कर्जत तालुक्यातील मिरजगाव शहरात येथील क्रांती चौकात सकल हिंदू समाजाच्या वतीने गुरूवारी, २६ मार्च रोजी श्रीराम नवमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी श्रीराम नवमीनिमित्त शहरातून सकाळी पारंपारिक वाद्यांसह ढोल ताशांच्या गजरात वाजतगाजत 'जय श्रीराम' चा जयघोष करत भव्यदिव्य अशा श्रीरामाच्या मूर्तीची रामफेरी काढण्यात आली. यामध्ये रामभक्त युवकांनी प्रभु श्रीराम व लक्ष्मणाची वेशभूषा परिधान केली होती. नंतर क्रांती चौकात प्रभू श्रीराम यांच्या भव्य अशा प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दुपारी १२ वा. मूर्तीपूजन करुन महाआरती करण्यात आली. याठिकाणी मिठाई वाटप करण्यात आली. यावेळी सकल हिंदू समाजाचे सर्व पदाधिकारी, रामभक्त तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीराम नवमी निमित्त श्रीराम कथा समारोप उत्साहात

■ प्रा. तपन मिश्रा यांचा सपत्नीक सत्कार

**किनवट : (समर्थ गांवकरी)**



श्रीराम नवमीच्या पावन पर्वानिमित्त श्रीराम मंदिर, किनवट येथे आयोजित श्री रामचरितमानस आधारीत श्रीराम कथा कार्यक्रमाचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दिनांक २० ते २६ मार्च दरम्यान पार पडलेल्या या सात दिवसीय श्रीराम कथेला भाविकांचा मोठा प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी रामनगर परिसरातील नागरिकांनी आमदार भिमराव केराम व नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांचे उत्साहात स्वागत केले.

कथावाचक प्रा. तपन मिश्रा यांनी आपल्या सुमधुर आवाजात आणि अभ्यासपूर्ण शैलीत श्रीराम कथांचे प्रभावी सादरीकरण करत उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. या यशस्वी कथासमारोपानिमित्त प्रा. तपन मिश्रा व सौ. मधुमित्रा मिश्रा धर्मपत्नींचा सपत्नीक सत्कार आमदार भिमराव केराम व नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांच्या हस्ते करण्यात आला.

परिसरातील मोठ्या संख्येने भाविक भक्तांनीही या कार्यक्रमास उपस्थित राहून श्रीराम नामाचा गजर केला. समारोपानंतर आयोजित महाप्रसादाचा लाभ भाविकांनी मोठ्या प्रमाणात घेतला. यावेळी आमदार भिमराव केराम व नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांनी शहरातील विविध विकासकामांबाबत सकारात्मक चर्चा केली. भविष्यात समन्वयातून विकासकामे गतीने पूर्ण करण्यावर दोघांनीही सहमती दर्शवल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली. या समारोप सोहळ्यास नगरसेविका प्रिती धिरज नेम्मानिवार, संतोष म्हरसकोल्हे, विश्वस्थ वेंकट भंडारवार, वेंकट सातुरवार, गिरिष नेम्मानिवार, माजी उपनगराध्यक्ष वेंकट नेम्मानिवार, सामाजिक कार्यकर्ते धिरज नेम्मानिवार तसेच उबाठा गटाचे संतोष येलचलवार यांची प्रमुख उपस्थिती होती. एकूणच श्रीराम नवमी उत्सवानिमित्त किनवट शहरात भक्तीमय व नवचैतन्यपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, विविध ठिकाणी धार्मिक कार्यक्रम, अन्नदान व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# गुप्तधनाच्या आमिषाने ६० लाखांची लूट

**लोहा : (समर्थ गांवकरी)**

■ आरोपी पोलीस हवालदाराला बेड्या, तपासी अधिकाऱ्यांनाच धमकी!

लोहा 'स्वस्तात सोने' आणि 'गुप्तधन' काढून देण्याच्या नावाखाली लोहा तालुक्यातील एका तरुणाला ६० लाख रुपयांना गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार नांदेड जिल्हा पोलीस दलातील एक हेडकॉन्स्टेबल असल्याचे समोर आल्याने खळबळ उडाली आहे. लोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने व त्यांच्या टीमने आरोपीला अटक केली असली, तरी आता पोलिसांवरच खोटे आरोप करून दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे. तक्रारदार सचिन बालाजी खेडकर (रा. खेडकरवाडी) यांना त्यांचा नातेवाईक ओमकार भुरे याने जाळ्यात ओढले. "स्वस्त दरात सोने मिळवून देतो आणि गुप्तधन सापडले आहे," असे आमिष दाखवून ६० लाखांच्या बदल्यात १ कोटीचे सोने देण्याचे आश्वासन देण्यात आले. या भूलथापांना बळी पडून सचिन यांनी नातेवाईकांकडून मोठी रक्कम जमा केली.१७ जानेवारी २०२६ च्या रात्री पारडी येथील एका निर्जन बांधकाम स्थळावर पैसे घेऊन बोलावण्यात आले. तिथे ६० लाख रुपये सिमेंटच्या पोत्यात भरून आरोपींनी लंपास केले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच खेडकर यांनी लोहा पोलीस ठाण्यात धाव घेत गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती.

# श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर श्रीराम नवमी उत्साहात साजरी

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

श्रीक्षेत्र मोहटादेवी गड येथे श्रीराम नवमी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.

वासंतीक नवरात्र महोत्सव अंतर्गत श्रीक्षेत्र मोहटादेवीगड येथे चैत्र शु. श्रीराम नवमीचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. श्रीराम नवमी निमीत्त श्रीक्षेत्र मोहटादेवीगडावर सकाळपासुन भावीकांची मोठी गर्दी होती. श्रीराम जन्माचा सोहळा विधीवत पुजन तहसिलदार तथा विश्वस्त डॉ. श्री. उध्दव नाईक, श्री शशिकांत दहिफळे, श्री बाबासाहेब दहिफळे, श्री अशोक दहिफळे, श्री बाळासाहेब लाहोटी, श्री शुभम दहिफळे यांच्या हस्ते करण्यात आले. विधीवत पुजन झाल्यानंतर फुलांच्या वर्षावाने तसेच जय



श्रीराम, जय मोहटादेवी च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता.

श्रीराम जन्मानंतर पारंपारिक पध्दतीने प्रभू रामाचा पाळण्याचे गायन करण्यात आले. आरतीनंतर भावीकांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले होते. श्रीराम जन्मोत्सवाचे विधीवत पुजन देवस्थानचे पुजारी वे भूषण साकरे, भास्कर देशपांडे यांनी केले. पाथर्डी येथील कु. गोला राधा आनंद, कु. गोला सस्कृती आनंद यांनी रांगोळीच्या सह्याने श्रीरामाची प्रतिमा साकारली. त्यानिमीत्ताने देवस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे, लेखापाल संदीप घुले , कर्मचारी, ग्रामस्थ व भावीक भक्त मोठ्या संख्यने उपस्थित होते. श्रीराम नवमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

वासंतीक नवरात्र महोत्सव अंतर्गत श्रीक्षेत्र मोहटादेवीगड येथे चैत्र शु. श्रीराम नवमीचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. श्रीराम नवमी निमीत्त श्रीक्षेत्र मोहटादेवीगडावर सकाळपासुन भावीकांची मोठी गर्दी होती. श्रीराम जन्माचा सोहळा विधीवत पुजन तहसिलदार तथा विश्वस्त डॉ. श्री. उध्दव नाईक, श्री शशिकांत दहिफळे, श्री बाबासाहेब दहिफळे, श्री अशोक दहिफळे, श्री बाळासाहेब लाहोटी, श्री शुभम दहिफळे यांच्या हस्ते करण्यात आले. विधीवत पुजन झाल्यानंतर फुलांच्या वर्षावाने तसेच जय श्रीराम, जय मोहटादेवी च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. श्रीराम जन्मानंतर पारंपारिक पध्दतीने प्रभू रामाचा पाळण्याचे गायन करण्यात आले. आरतीनंतर भावीकांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले होते. श्रीराम जन्मोत्सवाचे विधीवत पुजन देवस्थानचे पुजारी वे भूषण साकरे, भास्कर देशपांडे यांनी केले. पाथर्डी येथील कु. गोला राधा आनंद, कु. गोला सस्कृती आनंद यांनी रांगोळीच्या सह्याने श्रीरामाची प्रतिमा साकारली. त्यानिमीत्ताने देवस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे, लेखापाल संदीप घुले , कर्मचारी, ग्रामस्थ व भावीक भक्त मोठ्या संख्यने उपस्थित होते.

# पुरी येथे बैठक संपन्न

रावेर : (समर्थ गांवकरी)




जि.प.जळगाव मुख्यकार्यकारी अधिकारी मा.मिनलजी करनवाल मॅडम यांच्या संकल्पनेतून व रावेर पंचायत समिती गटविकास अधिकारी मा.विनोद मेढे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली रावेर तालुक्यातील पुरी गोलवाडे गृप ग्रामपंचायत अंतर्गत पुरी या गावात रात्री मुक्काम भेट करून गावातील अडी-अडचणी समस्यांचा आढावा घेण्यात आला. धरतीआबा योजनेचा यापूर्वी आराखडा तयार करण्यात आला होता .त्या अनुषंगाने गावातील समस्यांचा सुक्ष्म निरिक्षण करून जेथे जे आवश्यक कामे आहेत त्यांची नोंद करून सुधारित आराखड्यात त्या बाबींचा समावेश करण्यात येणार आहेत. सदरील ग्रामपंचायतीला प्रत्यक्ष भेटी देऊन गावातील लोकांशी समन्वय साधून गटचर्चा/चर्चासत्र घडवून ग्रामस्थांकडून विविध माहिती घेण्यात आली. ग्रामपंचायत पुरी गोलवाडे अंतर्गत पुरी येथे जि.प.शाळेतील अत्यावश्यक सोईसुविधा बाबत चर्चा केली. अंगणवाडी, आरोग्य उपकेंद्र साठी लागणारे साहित्य आणि मुलभूत गरजांबाबत माहिती घेतली. गावातील विविध समस्यांचा आढावा व इतर सर्व सुविधांबाबत चर्चा केली. यावेळी सुनिलभाऊ तायडे यांनी अनेक समस्या सांगितल्या . गावकऱ्यांसोबत गावफेरी करतांना गावातील प्रमुख व अंतर्गत रस्ते, गटारी, पाणी, आरोग्य, विद्युत पुरवठा, मुख्य रस्त्यालगत व गावात सोलर लॅम्प, बसस्थानक परिसर बैठक व्यवस्था व सुशोभीकरण, गावामागील तापी नदीलगत पर्यटन स्थळ विकसित करणेसाठी नदीवर बोटींची व्यवस्था करणे, ठिकठिकाणी व्हिव पॉईंट, उद्याने इत्यादी व्यवस्था करणे, गावात प्रवेश करतांनाचा रस्ता साफसफाई करून मोठा करणे, आदिवासी कानटोच्या देव रस्ता, रस्त्यालगत वृक्षारोपण सुशोभिकरण करणे, रोजगाराभिमुख प्रशिक्षण व योजनांची आखणी करणे, विविध सोयीसुविधा, सार्वजनिक शौचालय, सामाजिक सभागृह, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, युवकांना व्यायामशाळा, स्मशानभूमी सुशोभीकरण, उद्यान व रोजगार उपलब्धतेबाबत चर्चा करण्यात आली. या गावी मुक्काम भेटीसाठी पंचायत समिती टिम अहीरवाडी ग्रामपंचायत चे ग्रामपंचायत अधिकारी श्री.रविंद्र तायडे, स्थापत्य अभियंता राजेश तडवी, तालुका व्यवस्थापक पेसा युनुस तडवी, उमेद चे राहुल पाटील या उपक्रमात मोलाचे सहकार्य करणारे गृप ग्रामपंचायत पुरी गोलवाडे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, गावातील पोलीस पाटील, ग्रामपंचायत ऑपरेटर, आशासेवीका, अंगणवाडी सेविका, CRP बचतगट महिला, ग्रामरोजगार सेवक व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खैराच्या लाकडांनी भरलेली पिकअप गाडी जप्त

डांग-गुजरातः (समर्थ गांवकरी)




दक्षिण डांग वन विभागाचे डीसीएफ निरजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली वघई रेंजचे आरएफओ डी. के. रबारी यांच्या पथकाने काल रेंज परिसरातील दाट जंगल भागात गस्त घातली होती. त्यावेळी मिळालेल्या माहितीनुसार बेकायदेशीर लाकूड तस्करी रोखण्यासाठी करण्यात आलेल्या कारवाईत वघई रेंजच्या पथकाला मोठे यश मिळाले आहे.

गुजरात-महाराष्ट्र सीमेजवळील भूरभेंडी परिसरातून वन विभागाने पास-परमिट शिवाय खैराच्या लाकडांनी भरलेली बोलेरो पिकअप गाडी जप्त करून एकूण ₹२.९५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दक्षिण डांगचे उपवनसंरक्षक (DCF) निरजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली वघई रेंजच्या कर्मचाऱ्यांना गुप्त माहिती मिळाली होती की सीमावर्ती मार्गावरून लाकूड तस्करी होणार आहे.

या माहितीच्या आधारे २५ मार्च २०२६ रोजी भूरभेंडी येथे सापळा रचण्यात आला होता. दरम्यान, एक बोलेरो पिकअप गाडी (क्रमांक: MH ०४ HD ७७८६) वेगाने जात असताना वन कर्मचाऱ्यांनी तिचा पाठलाग केला.

वन विभागाचे पथक मागे असल्याचे लक्षात येताच चालकाने भूरभेंडी-पांगारणे रस्त्यावर गाडी बाजूला उभी करून अंधाराचा फायदा घेत पळ काढला.गाडीची तपासणी केल्यावर त्यातून बेकायदेशीररीत्या नेण्यात येणारी खैराची २६ नग लाकडे आढळली. वघई वन विभागाने १.३७८ घनमीटर खैर लाकूड (अंदाजे ₹४५,०००) आणि बोलेरो पिकअप गाडी (अंदाजे ₹२,५०,०००) असा एकूण ₹२,९५,००० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सध्या वघई वन विभागाने या प्रकरणी गुन्हा नोंदवून फरार चालकाचा शोध सुरू केला असून लाकूड कुठून आणले होते याबाबत पुढील तपास सुरू आहे.

## राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांची जयंती उत्साहात




मिरजगाव : (समर्थ गांवकरी)

कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांची ११९ वी जयंती येथील सकल कैकाडी समाज बांधव व समस्त ग्रामस्थांच्या वतीने गुरुवारी, दि.२६ मार्च रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मिरजगाव शहरातील गांधी मैदान याठिकाणी 'कैकाडी महाराज की जय' चा जयघोष करत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.

त्याचप्रमाणे मिरजगाव ग्रामसचिवालय याठिकाणी मा. सरपंच नितिन खेतमाळस यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. या जयंती उत्सव कार्यक्रमासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य गुलाब तनपुरे, मा.सरपंच नितीन खेतमाळस, माजी पंचायत समिती सदस्य डॉ.पंढरीनाथ गोरे, अमृत लिंगडे, भाजपा नेते हरिदास केदारी, संपत बावडकर, सारंग घोडेस्वार, सागर पवळ, सलिम आतार, डॉ.चंद्रकांत कोरडे, लहू वतारे, सुगंधी घोडके, बबन दळवी, महेश केदारी, सुरज शेंडगे, पै.अमोल माने, अनिल गायकवाड सर, शिवाजी जाधव, बाबुराव माने, प्रभाकर माने, नवनाथ माने, संजय माने, सुभाष माने, अशोक माने, लहू माने, बबन माने, अंकुश माने, पिंटू माने, अनिल माने, अखिल भारतीय कैकाडी समाज संघटनेचे मिरजगाव शहराध्यक्ष ईश्वर माने, उपाध्यक्ष तुषार जाधव, कार्याध्यक्ष अक्षय माने, सचिव ऋषिकेश माने, विक्रम माने, युवराज माने, स्वप्निल माने, संदीप जाधव, रोहीत जाधव, हनुमंत माने, पप्पू माने, अतुल माने, सातव सर, इस्माईल हवालदार यांच्यासह सर्व कैकाडी समाज बांधव, युवक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वृत्तपत्र उद्योगाच्या बचावासाठी व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतीने निवेदन

*"१५०% जाहिरात दरवाढीसह विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र शासनाकडे धाव"*

भोकर : (समर्थ गांवकरी)



राज्यातील वृत्तपत्र उद्योग गंभीर आर्थिक संकटातून जात असून त्याच्या संरक्षणासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी व्हॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम, तालुका भोकर यांच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व राज्य सरकारकडे तहसीलदार विनोद गुंडमवार यांच्या मार्फत संघटित निवेदन सादर करण्यात आले. दि. २५ मार्च २०२६ रोजी मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना उद्देशून हे निवेदन मा. तहसीलदार, भोकर यांच्यामार्फत पाठविण्यात आले. या निवेदनात वृत्तपत्र उद्योग हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून सध्या वाढत्या खर्चामुळे तो अडचणीत सापडल्याचे नमूद करण्यात आले आहे.

निवेदनानुसार, सन २०१९ पासून कागद, मुद्रण साहित्य, वीज व इतर खर्चामध्ये तब्बल १५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. मात्र, शासकीय जाहिरात दरात त्यानुसार वाढ करण्यात आलेली नाही. यामुळे विशेषतः लघु व मध्यम वृत्तपत्रांचे अस्तित्व धोक्यात आले असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

यावेळी व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत शासकीय जाहिरात दरात किमान १५०% वाढ करावी ई-टेंडर व शासकीय जाहिराती पूर्ण स्वरूपात प्रसिद्ध कराव्यात जाहिरातींसाठी किमान १०० चौ. से. आकार निश्चित करावा जाहिरात देयके ३० दिवसांत अदा करून विलंब झाल्यास व्याज द्यावे लघु व मध्यम वृत्तपत्रांना जाहिरात वाटपात समान संधी द्यावी सर्व शासकीय जाहिराती माहिती खात्यामार्फत देण्याची सक्ती करावी

१० वर्ष सेवा असलेल्या पत्रकारांना अधिस्वीकृती व २० वर्ष सेवा व ५५ वर्ष वय पूर्ण झालेल्यांना पेन्शन लागू करावी वृत्तपत्र उद्योग मजबूत राहिल्यासच जनतेच्या माहितीच्या अधिकाराचे संरक्षण होऊ शकते. त्यामुळे शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर व्हॉईस ऑफ मीडिया, भोकरचे तालुकाध्यक्ष संतोष रतनवार, सुभाष नाईक, ज्योती सरपाते , तालुका उपाध्यक्ष पत्रकार अनिल डोईफोडे, पत्रकार लक्ष्मण कदम, पत्रकार सुरेश दरभस्तवार, पत्रकार अशीत सोनवले, आदी पत्रकारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अवैध वाळू उपसा जोमात

नायगाव : (समर्थ गांवकरी)

तहसिलदार डॉ. धमप्रिया गायकवाड यांनी तिनं बोटि उडवून दिल्या दुसऱ्या दिवशी अवैध वाळू उपसा सुरू केले जाते तर नायगाव तालुक्यातील गावांतील मागील काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी व दिवसा ढवळ्या मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा जोमात होत असल्याचे दिसून येत आहे वाळू माफियांना रान मोकळं केले काय अंतरगाव येथील तलाठी मंडळ अधिकारी यांच्याच आशिर्वादाने हा सर्व प्रकार चालू आहे अशी चर्चा गांवातील काही सर्व सामान्य नागरीकांतुन दपक्या आवाजात चर्चा सुरू आहे. येथील वाळु माफीयांची वाळु चोरी व तस्करी वाढली आहे. या माफियांना ना कोणाचा धाक राहिला , ना कुणाची भिंती महसूल विभागाच्या वाळू माफिया रात्रीच्या दिवसाढवळ्या भागातून चालू आहे वाळूची चोरी करून खुलेआम वाहतूक करत आहेत.

## ठाण्यात धर्मवीर आनंद दिघे प्रतिष्ठानच्या चैत्र नवरात्रौत्सवात संस्कृतीचा जागर




ठाणे : (समर्थ गांवकरी)

भक्ती, परंपरा आणि मातृशक्तीचा जल्लोष यांचा त्रिवेणी संगम ठाण्याच्या चैत्र नवरात्रोत्सवात अनुभवयास मिळाला. धर्मवीर श्री आनंद दिघे प्रतिष्ठानच्या वतीने कोपरी येथील संत तुकाराम महाराज मैदानावर आयोजित चैत्र नवरात्रौत्सवात बुधवारची सायंकाळ भक्तिरस आणि रंगतदार रास दांडियाच्या तालावर अक्षरशः रंगून गेली. भाविकांनी अंबे मॉंतेच्या गीतांवर संस्कृतीचा जागर केला. राज्याचे उपमुख्यमंत्री शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून सुरू असलेल्या सहस्त्रचंडी हवनात्मक नवकुंडीय महायज्ञाच्या अष्टमी दिनी सहस्त्रचंडी याग आणि सांज आरती पार पडली. या पवित्र सोहळ्यात सौ. लता एकनाथ शिंदे, बिग बॉसच्या घरात कल्ला करणारी ठाणेकर अभिनेत्री जान्हवी किल्लेकर तसेच, अभिनेते मंगेश देसाई यांनी उपस्थिती दर्शवत अंबे मातेची सांज आरती केली. भक्तिमय वातावरणात झालेल्या आरतीने भाविकांच्या मनात श्रद्धेची दीपज्योत प्रज्वलित केली. यानंतर रंगलेल्या रंगाई प्रस्तुत 'रंगीलो रास दांडिया नाईट' च्या रंगतदार पर्वात अंबे मॉंतेचा गजर करीत अवघी स्त्री शक्ती एकवटली. सौ.लता एकनाथ शिंदे यांनीही रास दांडीयामध्ये सहभाग दर्शवला. प्रारंभी स्थानिक महिलांनी मंगळागौरचे विविध खेळ सादर करीत प्लास्टिक टाळुन पर्यावरण जपण्याचा मौलिक संदेश दिला. त्यानंतर 'महाराष्ट्राची हास्य जत्रा' फेम शाम बांगर यांच्या उपस्थितीत वादकांच्या सुरेल साथीत महिलावर्गाने रास दांडियाचा फेर धरला. गायक विजय धुरी, के. पौर्णिमा, हरीश ठक्कर आणि उर्मिला धनु यांनी सादर केलेल्या मराठी - हिंदी पारंपरिक गाण्यांसह देवी गीतांनी संपूर्ण परिसर भारावून गेला. अभिनेत्री जान्हवी किल्लेकर हिनेही दांडियात सहभाग घेतल्याने महिलांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. तिच्यासोबत दांडिया खेळत सेल्फी घेण्याचा आनंद महिलांनी मनसोक्त लुटला. रास दांडीयाच्या समारोप पर्वात उपमुख्यमंत्री एकनाश शिंदे यांनी सभामंडपात उपस्थिती दर्शवुन कलाकारांना प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरजे अमित काकडे यांनी अत्यंत रंगतदार पद्धतीने करत उपस्थित महिलांना रास दांडीयाच्या नृत्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांच्या उत्साही शैलीमुळे 'रास दांडीया' खेळात अधिक रंगत आली. या सोहळ्यास महापौर शर्मिला पिंपळोलकर, जयप्रकाश कोटवानी, प्रमोद बनसोडे, राहुल लोंढे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, नगरसेवक आणि हजारोंच्या संख्येने भाविक उपस्थित होते.

## शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवावे : आ. काशिनाथ दाते सर

पारनेर : (समर्थ गांवकरी)



महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत आयोजित “छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर” आज उत्साहात व मोठ्या प्रतिसादात पार पडले. या शिबिरात पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी जनतेच्या समस्या थेट ऐकून त्यावर तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देत प्रशासनाला अधिक लोकाभिमुख होण्याचे आवाहन केले. यावेळी आमदार दाते म्हणाले, “शासनाच्या योजना व सेवा या कागदावर न राहता थेट जनतेपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. गावपातळीवर अशा शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांच्या अडचणी जागेवरच सोडवणे, हेच प्रशासनाचे खरे यश आहे. महसूल, कृषी, परिवहन, आरोग्य, शिक्षण, सहकार अशा विविध विभागांनी एकत्र येऊन जनतेला दिलासा देण्याचा हा उपक्रम अत्यंत उपयुक्त आहे.”

ते पुढे म्हणाले, “शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या तात्काळ मार्गी लावण्यासाठी अशा शिबिरांची गरज आहे. शासन जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध असून प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत योजनांचा लाभ पोहोचवण्यासाठी आपण सर्वांनी समन्वयाने काम केले पाहिजे. शासनाच्या योजना थेट जनतेपर्यंत पोहोचून त्यांच्या अडचणी जागेवरच सुटल्या पाहिजेत. अशा शिबिरांमुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळत असून शासनाच्या ह्या उपक्रमाची फलश्रुती सर्वसामान्य नागरिकांच्या समाधानात शोधल्यास निच्छितच सापडत असून एक जनतेचा प्रतिनिधी म्हणुन ह्या गोष्टीचा मला मनस्वी आनंद आहे.” या शिबिरात भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, तहसीलदार गायत्री सौंदाने, तालुका कृषी अधिकारी गजानन घुले, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, स्वप्नील ठुबे, अर्जुन नवले, संतोष ठुबे, बाबा चेडे, रमेश गाडगे यांसह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच सेतू केंद्र चालक, संजय गांधी योजना शाखा, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, वनविभाग, सामाजिक वनीकरण, बचत गट, भूमिअभिलेख, प्राथमिक आरोग्य केंद्र, शिक्षण, सहकार, दुय्यम निबंधक आदी विभागांचे प्रतिनिधी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घेतला.

या शिबिरातून अनेक नागरिकांच्या समस्या जागेवरच निकाली काढण्यात आल्या असून तालुक्यातील इतर मंडलांसाठी ज्या ज्या वेळी ह्या शिबिराचे आयोजन करण्यात येईल त्या त्या वेळी सबंधित मंडलातील नागरिकांनी आपल्या शासन दरबारी असलेल्या समस्या सोडविण्यासाठी लाभ घ्यायला हवा.

## रामनवमी निमित्त पिंपळगाव येथे श्रीराम कथेची सांगता उत्साहात

तामसा : (समर्थ गांवकरी)

रामनवमीच्या पावन पर्वावर पिंपळगाव येथे आयोजित श्रीराम कथेची सांगता अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडली. या वेळी कथा व्यास राधाकृष्ण जी महाराज यांनी उपस्थित भाविकांना अध्यात्मिक मार्गदर्शन करताना “गुरु हा CCTV सारखा असावा, ज्याच्या दृष्टीत शिष्याचे संपूर्ण जीवन असते,” असे प्रतिपादन केले.

महाराज पुढे म्हणाले की, जे घरात सुंदर देवघर निर्माण करतात, त्या घरातच खरी पावित्र्य, सकारात्मकता आणि देवत्व नांदते. प्रत्येकाने आपल्या घरात देवाचे स्थान निर्माण करून सतत नामस्मरण करावे, असे त्यांनी आवाहन केले. यावेळी त्यांनी रावण व विभीषण यांचा प्रसंग सांगत भक्तांना भावनिक व बोधप्रद संदेश दिला. विभीषणाने आपल्या घरावर “राम” असे नाव लिहिल्याने रावण संतप्त झाला. परंतु विभीषणाने अत्यंत मार्मिक उत्तर देत “रावण” या नावातील ‘रा’ आणि मंदोदरीच्या नावातील ‘म’ मिळून “राम” होत असल्याचे सांगितले. या उत्तराने रावण शांत झाला; मात्र प्रत्यक्षात विभीषण हा श्रीरामाचा निष्ठावंत भक्त होता आणि त्याच्या मुखी सतत रामनाम असायचे, हे त्यांनी स्पष्ट केले.

“रामनामात अपार शक्ती असून ते मन, घर आणि समाज शुद्ध करते,” असे सांगत महाराजांनी उपस्थितांना रामभक्तीचा संदेश दिला. या कथेच्या सांगतेच्या प्रसंगी परिसरातील असंख्य साधू-संत, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेषतः महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. संपूर्ण परिसर “जय श्रीराम”च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता.

## स्व. अरुण काका जगताप जयंतीनिमित्त भव्य महाआरोग्य शिबिर संपन्न

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



स्वर्गीय आमदार अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट, अहिल्यानगर मनपा तसेच आयुष्यमान भारत आणि महात्मा फुले जन आरोग्य योजना यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. समाजामध्ये आरोग्याबाबतच्या नवनवीन समस्या निर्माण होत असून, धकाधकीच्या जीवनशैलीमुळे नागरिक आरोग्याकडे अक्षरशः दुर्लक्ष करत आहेत. दिवसेंदिवस आरोग्यसेवा महाग होत चालल्यामुळे सर्वसामान्य नागरिक उपचारांपासून दूर राहतात. अशा परिस्थितीत नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे, त्यांच्या आजारांचे वेळेवर निदान होऊन योग्य उपचार मिळावेत या उद्देशाने साई द्वारका सेवा ट्रस्ट सातत्याने कार्यरत आहे. ट्रस्टचे आरोग्य क्षेत्रातील कार्य अत्यंत कौतुकास्पद असून केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे कामही ते करत आहेत, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी या महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती करण्याचे काम केले आहे. तसेच सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांना मोफत आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत आरोग्य कार्डचे वाटप करून समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडले आहे. श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट, अहिल्यानगर मनपा व आयुष्यमान भारत, महात्मा फुले जन आरोग्य योजना यांच्या वतीने आयोजित या महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, माजी महापौर भगवानराव फुलसौंदर, माजी उपमहापौर गणेश भोसले, अनिल बोरुडे, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, भाजप गटनेते शारदाताई ढवण, माजी सभापती अविनाश घुले, प्रा. माणिक विधाते, नगरसेवक निखिल वारे, गणेश कवडे, दत्ता गाडळकर, सुजय मोहिते, ऋग्वेद गंधे, ह.भ.प. अमित महाराज धाडगे, बाबासाहेब सानप, सागर मुर्तडकर, ज्ञानेश्वर रासकर, डॉ. प्रकाश गरुड, रोहन सानप, अभिजीत बोरुडे, सुशांत जाधव आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, स्वर्गीय अरुण काका जगताप यांनी नेहमीच समाजहितासाठी कार्य करत गरजू नागरिकांना मदतीचा हात दिला. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सकारात्मक दृष्टिकोनातून सामाजिक बांधिलकी जोपासणे हीच खरी श्रद्धांजली आहे. ते पुढे म्हणाले की, नागरिकांच्या घरापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचे कार्य साई द्वारका सेवा ट्रस्टच्या माध्यमातून केले जात आहे. आजच्या महाआरोग्य शिबिरामध्ये शहरातील सुमारे १५ नामांकित रुग्णालयांच्या माध्यमातून नागरिकांची तपासणी करण्यात येत आहे. तसेच आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत आरोग्य कार्डचे वाटपही करण्यात आले. या शिबिरात तपासणी करण्यात आलेल्या रुग्णांपैकी ज्यांना शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे, अशा रुग्णांच्या पुढील उपचाराचा संपूर्ण खर्च श्री साई द्वारका सेवा ट्रस्टच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. “रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा आहे,” असेही त्यांनी यावेळी नमूद केले. स्व. अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या महाआरोग्य शिबिरातून हजारो नागरिकांना मोफत आरोग्य सेवा मिळाली असून, अशा उपक्रमांमुळे समाजात आरोग्याबाबत जागरूकता वाढण्यास मोठी मदत होत आहे.

# जिल्ह्यात पेट्रोल - डिझेलचा मुबलक साठा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व गॅसचा मुबलक साठा उपलब्ध असून वितरण व्यवस्था अत्यंत सुरळीत सुरू आहे.सध्या सोशल मीडिया व व्हॉट्सअ‍ॅपवर इंधन तुटवड्याबाबत पसरवल्या जाणाऱ्या बातम्या पूर्णपणे खोट्या व दिशाभूल करणाऱ्या आहेत. नागरिकांनी अशा कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, पॅनिक होऊन पेट्रोल पंपांवर विनाकारण गर्दी करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे. या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आज जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली, पोलीस अधीक्षक व पुरवठा विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांसोबत एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल किंवा गॅसचा तुटवडा असल्याचा खोटा मेसेज किंवा चुकीची माहिती पसरवणे हा कायद्याने दंडनीय अपराध आहे. जे लोक अशी बेकायदेशीर कृत्ये करून नागरिकांमध्ये घबराट निर्माण करत आहेत, त्यांच्याविरुद्ध पोलीस विभागाच्या समन्वयाने थेट गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा सक्त इशारा या बैठकीत प्रशासनाकडून देण्यात आला आहे. प्रशासनाने दिलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार जिल्ह्यातील इंधन साठ्याची वस्तुस्थिती अत्यंत समाधानकारक आहे. पेट्रोलची (MS) जिल्ह्याची दररोजची गरज ३०८ किलोलिटर (KL) इतकी असून, सध्या ८४६ किलोलिटर इतका मुबलक साठा उपलब्ध आहे. तसेच, डिझेलची (HSD) दररोजची गरज ६८९ किलोलिटर (KL) असताना, सध्या १४७१ किलोलिटर इतका साठा उपलब्ध आहे. याशिवाय, प्रमुख तेल कंपन्यांकडून इंधनाचा नियमित पुरवठा विनाअडथळा सुरू असल्याने तुटवड्याची कोणतीही शक्यता नाही. जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचा इंधन तुटवडा निर्माण झालेला नसल्यामुळे नागरिकांनी इंधनाची अनावश्यक साठेबाजी करू नये.



ठाणे : ठाणे महापालिकेच्या प्रभाग २९ मधील डायघर येथील ओंकारेश्वर मंदिर येथे खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार राजेश मोरे व दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी यांच्या सहकार्याने कॉंक्रीट रस्त्यासाठी आमदार राजेश मोरे यांच्याहस्ते भूमिपूजन पार पडले प्रसंगी नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चना पाटील व उपविभाग प्रमुख दिपेशजी पाटील, मधुकर पाटील, शाखाप्रमुख बाबुराव पाटील, संदेश पाटील, महेश पाटील व विभागातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.
(फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### वाघा येथे घरफोडी, ३ लाख ९६ हजारांचे सोन्याचे दागिने लंपास

जामखेड **(स. गांवकरी)** : जामखेड तालुक्यातील वाघा येथे दि २५ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी ३ लाख ९६ हजारांचे सोन्या चांदीचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी अज्ञात चोरट्या विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जामखेड तालुक्यातील वाघा याठिकाणी फीर्यादी आकाश रामदास बारस्कर वय २६ वर्षे हे आपल्या आई वडीलांसह घरातील एका हॉलमध्ये झोपले होते. यावेळी दि. २५ मार्च रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश केला व फीर्यादी झोपलेल्या हॉलची बाहेरुन कडी लावुन घेतली होती. यानंतर या चोरट्यांनी फीर्यादीच्या कीचनच्या दरवाज्याचा कडीकोंडा तोडुन आत प्रवेश केला. तसेच कीचन मधिल कपाटाची उचका पाचक करुन कपाटात ठेवलेले सोन्याचे मणीगंठन, सोन्याची अंगठी, सोन्याची चैन, कर्णफुले, नथ, बोरमाळ, गंठण, बदाम पेटी, कानातील वेल सोन्याची नथ, सुट्टे मनी, कानातील झुबे व चांदीचे काही दागीने असा एकुण ३ लाख ९६ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला व चोरटे पसार झाले. पहाटे फीर्यादीचे वडील हे लघुशंकेला उठले असता हॉलची चोरट्यांनी बाहेरुन कडी लावलेली लक्षात आले. यानंतर किचन मध्ये ठेवलेल्या सोन्या चांदीचे दागिने चोरीला गेले असल्याचे लक्षात आले. या चोरी प्रकरणी फीर्यादी आकाश रामदास बारस्कर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जामखेड पोलीस स्टेशनला अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळी फॉरेन्सिक टीम दाखल झाली होती. तसेच कर्जत जामखेड चे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद लोखंडे व जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी घटनास्थळी भेट दिली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संपत कन्हेरे हे करित आहेत.

### नमो योजनेचा ८ वा हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा!



इंदापूर **(स. गांवकरी)** : नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा ८ वा हप्ता राज्यातील शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आला आहे. या हप्त्यामुळे राज्यातील तब्बल ८९ लाख ७४ हजार शेतकऱ्यांना लाभ मिळाला असून शासनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आर्थिक बळकटीसाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. या हप्त्याअंतर्गत एकूण रु. १७,९८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून DBT (Direct Benefit Transfer) प्रणालीद्वारे ही रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. यामुळे पारदर्शकता वाढून शेतकऱ्यांना कोणत्याही अडथळ्याविना त्वरित लाभ मिळत आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेती अधिक सक्षम करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून त्यांच्या प्रगतीसाठी विविध योजना प्रभावीपणे राबवत आहे अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सोशल माध्यमातून दिली.

### सेवापूर्ती सत्कार व गौरव समारंभाचे आयोजन



श्रीगोंदा तालुका **(स. गांवकरी)** : लोणी व्यंकनाथ (ता. श्रीगोंदा) – शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत 'नाईक' या पदावर कार्यरत असलेले श्री. नंदकुमार नारायणराव कुरुमकर हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत असून, त्यानिमित्त त्यांच्या सेवापूर्ती सत्कार व गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. हा समारंभ शनिवार, दि. २८ मार्च २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता जिजाई मंगल कार्यालय, लोणी व्यंकनाथ, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर येथे संपन्न होणार आहे. तरी सर्व मान्यवर व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :** नगर मध्ये श्रीराम जन्मोत्सव स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळाच्या वतीने बागडपट्टी मधील भगवान जिव्हेश्वर मार्ग येथील समाजाच्या लक्ष्मीनारायण मंदिरात मोठ्या उत्साहात संपन्न झाला

# भव्य मिरवणूक : २१८ व्यक्तींना हद्दपारीचे आदेश

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




जिल्ह्यासह अहिल्यानगर शहरात श्रीराम नवमीचा उत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यंदाही काल (गुरूवार) रोजी सायंकाळी शहरात भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून, या मिरवणुकीत चार मंडळे सहभागी होणार आहेत. या पार्श्वभूमीवर शहर पोलीस प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले असून, शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी कडक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मिरवणुकीचा प्रारंभ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून होणार असून, हिंदुत्ववादी संघटना आणि रामभक्तांनी यासाठी जय्यत तयारी केली आहे. सायंकाळी निघणाऱ्या या मिरवणुकीत हिंदू राष्ट्र सेना, सकल हिंदू समाज, वास्तव कंपनी तसेच श्रीराम सेना बोल्हेगाव ही चार मंडळे सहभागी होणार आहेत. मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष दक्षता घेतली आहे.

मार्गावरील उंच इमारतींवरून पोलिसांची करडी नजर राहणार असून, दुर्बिणींच्या साहाय्याने संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवले जाणार आहे. संपूर्ण मिरवणूक मार्गावर बॅरिकेडिंग करण्यात आले असून, वाहतूक तात्पुरती बंद ठेवण्यात येणार आहे. तसेच दोन ड्रोन कॅमेरे आणि सीसीटीव्हीच्या माध्यमातून मिरवणुकीवर लक्ष राहणार आहे. हुल्लडबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान, मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील २१८ गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना भारतीय न्याय दंड संहिता सुरक्षा कलम 163 (2) अंतर्गत मिरवणुकीच्या काळात हद्दपारीचे समन्स बजावण्यात आले आहेत. त्यामध्ये तोफखाना पोलीस ठाणे हद्दीतील ९९, कोतवाली हद्दीतील ७० आणि भिंगार कॅम्प हद्दीतील ४९ जणांचा समावेश आहे.

सन २०१५ मध्ये पहिली मिरवणूक आशा टॉकीज मार्गे काढण्यात आली होती. त्यावेळी वाद होऊन दंगल उसळली होती. त्यानंतर २०१६ पासून मिरवणूक बॉम्बे बेकरी-चांद सुलताना स्कूल मार्गे काढण्यात येत आहे. मात्र, संघटनांनी पुन्हा जुन्या आशा टॉकीज मार्गेच मिरवणूक काढण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, पोलीस प्रशासन नवीन मार्गावर ठाम असून, त्या मार्गाची पाहणी करून आवश्यक बंदोबस्ताची तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

# २४५ दिव्यांगांना सुमारे ३० लाख रुपयांच्या साहीत्याचे वितरण

**अकोले : (समर्थ गांवकरी)**




तालुक्यातील २४५ दिव्यांग व्यक्तींना सुमारे ३९लाख ३०लाख रुपयांच्या सहाय्यक साधन साहीत्याचे वितरण शुक्रवारी करण्यात येणार आहे. भारत सरकारच्या इंडीयन ऑयल कार्पोरेशन लिमिटेड यांच्या सामाजिक दायित्व योजने अंतर्गत तसेच भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम ( अलिम्को ) तसेच जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र आणि जिल्हा दिव्यांग विभाग अहील्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांगांना साधन साहीत्याचे वितरण करण्यात येते. अहिल्यानगर जिल्ह्यात जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवानेते भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.सुजय विखे पाटील यांच्या संकल्पनेतून तसेच मा.आ.वैभवराव पिचड यांच्या प्रयत्नातून जिल्ह्यातील दिव्यांगाना साधन साहीत्याचे वितरण सातत्याने करण्यात येत आहे. अकोले तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींची यासाठी नोंदणी करण्यात आली होती. या साहीत्याचे वितरण शुक्रवार दि.२७मार्च २०२६रोजी सकाळी १० ते ४ या वेळेत अगस्ती महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात येणार आहे. साहीत्य वितरण समारंभास श्रीमती हेमलताताई पिचड, श्रीमती सुनिताताई भांगरे, सौ.धनश्रीताई विखे पाटील यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

# आठव्या वेतन आयोगाबाबत केंद्र सरकारने दिली अपडेट

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**




सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आठवा वेतन आयोग लवकरच लागू होणार आहे. या वेतन आयोगाबाबत अर्थ मंत्रालयाने संसदेत माहिती दिली आहे. अर्थ मंत्रालयाने सांगितले की, आठव्या वेतन आयोगासाठी अधिकृत काम सुरु झाले आहे. येत्या काळात पगार, भत्ते आणि पेन्शनमध्ये बदल होऊ शकतो. लोकसभेत याबाबत सरकारने माहिति दिली. आठव्या वेतन आयोगाची टाइमलाइन, काम आणि संभाव्य तारखेबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे.

सरकारच्या मते, ३ नोव्हेंबर २०२५ रोजी आठव्या वेतन आयोगाच्या समितीची स्थापना केला. या समितीच्या अध्यक्ष माजी न्यायमूर्ती रंजना प्रताश देशाई आहेत. पुलक घोष हे पार्ट टाइम सदस्य आहेत. पंकज जैन हे सेक्रेटरी म्हणून कार्यरत आहेत. या वेतन आयोगाच्या समितीचे काम वेतन रचना, भत्ता आणि पेन्शनबाबत शिफारसी तयार करणे आहेत.अर्थ मंत्रालयाने सांगितले की, वेतन आयोगाच्या समितीला १८ महिन्याचा वेळ दिला आहे. म्हणजेच २०२७ मध्ये शिफारसी लागू होऊ शकतात. दरम्यान, शिफारसी लागू झाल्यानंतर अंतिम निर्ण केंद्र सरकार घेणार आहे. त्यानंतरच कर्मचाऱ्यांना पगारवाढ मिळणार आहे. सध्या आठव्या वेतन आयोगासाठी किती निधी लागेल, सरकारी तिजोरीवर किती ताण पडेल, याबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नाही. ही सर्व माहिती शिफारसी लागू झाल्यानंतर समजणार आहे. आठव्या वेतन आयोगासाठी कर्मचाऱ्यांची मते लक्षात घेतली जाणार आहे. कर्मचाऱ्यांच्या सूचनांसाठी ऑनलाइन पोर्टल सुरु केले आहे. या पोर्टलवर जाऊन तुम्हाला तुमचे मत मांडायचे आहे. वेबसाइटवर जाऊन माहिती द्यायची आहे. यासाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत अंतिम मुदत आहे.

# जीवनामध्ये दुःख असेल तर प्रभू श्री रामाला आठवा

*हभप लक्ष्मण महाराज कदम शास्त्री : श्रीक्षेत्र निघोज येथे श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न*



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील जगप्रसिध्द कुंड पर्यटन क्षेत्र,श्रीक्षेत्र निघोज येथे प्रभू श्रीराम जन्मोत्सव मोठया उत्साहामधे साजरा झाला. श्रीराम जन्मोत्सवा निमित्त श्रीरामचे मंदिरा समोर अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताह काळात दररोज संध्याकाळी सात ते नऊ या वेळेमध्ये राज्यातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने झाली. सलग 45 वर्षापासून निघोज गावामध्ये प्रभू श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा होत असतो. आणि अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन दरवर्षी होत असते. आज प्रभू श्रीराम जन्मोत्सवानिमित्त सकाळी 10 ते 12 या वेळेत, हभप, लक्ष्मण महाराज कदम शास्त्री यांची रामजान्माची किर्तनसेवा झाली.यावेळी महाराजांनी,श्रीसंत तुकाराम महाराजांच्या "धर्मरक्षावया अवतार घेसी,आपुल्या पाळीसी भक्तजना " या अभंगावर सविस्तर निरूपण केले. देव भक्ताचे रक्षण करत, दुर्जनांचा संहार करतो असे महाराज म्हणाले. सदर अभंगामधून भक्तावरील प्रेम आणि दृष्टांचा नाश्यासाठी घेतलेल्या अवताराचे वर्णन केलें आहें. आपल्या संकटात भक्तांना सांभाळण्यासाठी आणि धर्माचे रक्षण करण्यासाठी देव युगानूयुगे अवतार घेत असतो. तसेच भक्तांना त्रास देणाऱ्या आणि दुष्ट राक्षसांचा संहार देवानेच केला आहे. जीवनामध्ये गुरूला आनंद साधारण महत्त्व असून, जेव्हा बापाचा धाक नसतो तेव्हा गुरूंचा धाक असावा लागतो असेही महाराज म्हणाले. यावेळी प्रभू श्रीराम जन्मोत्सवा निमित्त दुपारी बरोबर 12 वाजता पुष्पवृष्टी करत प्रभू श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी महिला भाविकांनी पाळणे आणि प्रभू श्रीराम यांची भक्तीगीते सादर केली. यावेळी हरिभक्त परायण लक्ष्मण महाराज कदम शास्त्री आळंदी यांचा सन्मान मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी अध्यक्ष प्रभाकर शेठ कवाद यांनी केला. संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन हरिभक्त सोमनाथ महाराज वरखडे यांनी केले. खिचडी केळी आणि फळे अशा महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पाणी योजना यशस्वी पद्धतीने चालविण्याचे दिले धडे

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



पाणी योजना कशा पद्धतीने चालविली पाहिजे, त्यात येणारे अडथळे, बारकावे, पाणी गळती कशी थांबवावी, लोकांचा सहभाग कसा घ्यायचा, पाणी योजनेचे वीज बिल कमी करण्यासाठी काय केले पाहिजे, पाणी योजना चालवितांना अधिकारी पदाधिकाऱ्यांनी समन्वयाची भूमिका ठेवणे किती महत्वाचे आहे. गटविकास अधिकारी यांनी योजना राबवितांना कोणती भूमिका घेतली पाहिजे, कोणती काळजी घेतली पाहिजे, जनतेच्या मनातील संभ्रम दूर करून पाणी योजनेच्या भविष्यासाठी कठोर भूमिका कशा पद्धतीने ठेवली पाहिजे याबद्दल जिल्हा परिषद सदस्य, माजी सभापती, घोसपुरी पाणी योजनेचे माजी अध्यक्ष संदेश कार्ले यांनी गटविकास अधिकाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. पुणे येथील यशदा च्यावतीने आयोजित विशेष ऑनलाइन सत्रात मंगळवारी (दि.२४) अहिल्यानगर जिल्हा परिषदचे माजी सदस्य तथा नगर तालुका पंचायत समितीचे माजी सभापती संदेश कार्ले यांनी आपल्या राजकीय आणि प्रशासकीय अनुभवांची सविस्तर मांडणी केली. यशदाच्या रेश्मा होजगे यांच्या विशेष निमंत्रणावरून हे सत्र आयोजित करण्यात आले होते. या सत्रामध्ये राज्यभरातील सुमारे २८५ गटविकास अधिकारी व सहाय्यक गटविकास अधिकाऱ्यांनी ऑनलाइन सहभाग घेतला. पाणीपुरवठा योजना, अधिकारी-पदाधिकारी संबंध आणि गटविकास अधिकाऱ्यांची योजना राबवताना भूमिका या तीन महत्त्वपूर्ण विषयांवर संदेश कार्ले यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्ले यांनी विशेषतः घोसपुरी पाणीपुरवठा योजनेचा अनुभव सांगताना योजना राबविताना आलेल्या अडचणी, त्यावर शोधलेले उपाय, तसेच टँकरद्वारे केलेल्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना मिळालेले समाधान यांचा उल्लेख केला. याशिवाय, पंचायत समितीच्या पाच वर्षांच्या कार्यकाळात राबवलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेत, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वय किती महत्त्वाचा आहे हे त्यांनी अधोरेखित केले. कार्यकाळात एकत्र काम केलेल्या अधिकाऱ्यांच्या आठवणींना उजाळा देताना, माजी मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र शिरसागर, शैलेश नवल तसेच तत्कालीन जिल्हाधिकारी संजीव कुमार, अनिल कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकाभिमुख कामे कशी प्रभावीपणे राबवता आली, याचा अनुभवही त्यांनी मांडला. गावातील सरपंच आणि ग्रामस्थ यांचा मोठा सहभाग लाभला. गटविकास अधिकारी यांच्याशी ऑनलाईन संवादातून अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिक्रिया आणि सहकार्याच्या भावना यामुळे आपल्या कामाचा खरा ठेवा काय आहे, याची जाणीव झाली, असे कार्ले यांनी सांगितले. मी समोर नसतानाही अधिकारी एकत्र येऊन चांगल्या कामांची चर्चा करताना माझे नाव घेतात, हीच माझ्यासाठी सर्वात मोठी कमाई आहे, असे ते म्हणाले. सुस्थितीत असलेल्या पाणी योजनेत राजकारण शिरल्यास योजनेला अशा पद्धतीने दृष्ट लागते हे घोसपुरी पाणी पुरवठा योजनेचे सध्याचे उदाहरण देवून सांगितले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# श्री रत्न जैन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

## शिक्षक वृंद कृतज्ञता सोहळा

- २४ वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांना २००२-०३ च्या काळात गेल्याची अनुभूती
- एकत्र आलेल्या मित्र-मैत्रिणींचा आनंद गगनात मावेना

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील माणिकदौंडी येथील श्री रत्न जैन विद्यालयातील माजी विद्यार्थांचा स्नेह मेळावा २४ वर्षानंतर नुकताच पार पडला.

प्रवेशद्वारावर औक्षण व पुष्प वर्षाव करून सर्व गुरुजनांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दिप प्रज्वलनाने करण्यात आली. याप्रसंगी माजी प्राचार्य प्रकाश शेवाळे आपल्या अध्यक्षीय मनोगतात म्हणाले की, माणिकदौंडी सारख्या ग्रामीण व दुर्गम भागातील अनेक विद्यार्थ्यांची परिस्थिती गरिबीची व बिकट होती.या भागातील पालकांचा मुख्य व्यवसाय हा शेती व ऊस तोडणी हा आहे. दिवाळीनंतर पोट भरण्यासाठी अनेक कुटुंब राज्याच्या विविध जिल्ह्यात ऊस तोडणीसाठी स्थलांतरीत होतात. अनेक निरागस लेकरं ऊन, वारा,पाऊस याचा विचार न करता अनवाणी पायांनी पाऊलवाट तुडवत शाळेत यायचे.काही मुलांचे फाटलेले कपडे, दुपारच्या जेवणावेळी फडक्यात बांधलेली भाकर त्यांच्या परिस्थितीची व आमच्या जबाबदारीची जाणीव करून देत होती. ज्ञानदानाचे पवित्र



कार्य करताना आम्ही कुठेही कमी पडलो नाही. म्हणून आज अनेक क्षेत्रात आमचे विद्यार्थी मोठ्या पदावर कार्यरत आहेत. या परिसरातील विद्यार्थ्यांचा संघर्षमय प्रवास खरोखरच प्रेरणादायी आहे. शांत,संयमी व संस्कारशिल पिढीच या राष्ट्राची खरी संपत्ती आहे.

स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने चांगले विचार समाजात तुम्ही पेरत आहात. आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली याचा आनंद व अभिमान वाटतो.

कार्यक्रमाचे नियोजन अतिशय सुंदर व दिमाखदार केले होते.सर्व गुरुजनांना सन्मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. आपल्या भावना वक्त करताना सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थ्यांना २००२ च्या काळात गेल्याची अनुभूती येत होती, एकच आलेल्या मित्र-मैत्रिणीचा आनंद गगनात मावेना.

कार्यक्रमाच्या दर्शनी भागात काढलेली आकर्षक रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. काही दिवंगत गुरुजनांना देखील याठिकाणी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दुपारच्या सत्रात गप्पा,गोष्टी गाणीसह सांस्कृतिक कार्यक्रमाचे देखील नियोजन केलेले होते. आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांसह सर्वांना नाष्टा व स्नेह भोजनाचे आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी आश्रम शाळेस फॅन सप्रेम भेट म्हणून देण्यात आला. यावेळी व्यासपीठावर श्री तिलोक जैन चे प्राचार्य अजय भंडारी, श्री रत्न जैन चे मुख्याध्यापक राजाराम माळी, पर्यवेक्षक अशोक गर्जे, बबन फुंदे,पोपटलाल गांधी,समाधान आराख, राजेंद्र चव्हाण,रेवणनाथ वायकर,संजय शिंदे, सुभाष खेडकर,अनिल पटवा,मनिषा मोरे,सदानंद सुतार व महेंद्र राजगुरू हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल शेळके,अध्यक्ष निवड प्रकाश भोसले, सूत्रसंचालन सचिन चव्हाण तसेच आभार किरण साबळे यांनी मानले.

# यशवंत घोडे यांची उल्लेखनीय कामगिरी

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

पुणे शिक्षण विभाग (प्राथमिक) आयोजित शिक्षक सक्षमीकरण स्पर्धा २०२५-२०२६ मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कुमशेत ता:-जुन्नर, जि:- पुणे येथील उपक्रमशील शिक्षक यशवंत मारुती घोडे यांनी "पुस्तक समीक्षा" या स्पर्धेत जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.ही स्पर्धा जि: प: प्राथमिक शाळा,धानोरे ता:- खेड,जि:- पुणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.यावेळी मान्यवरांच्या हस्ते यशवंत घोडे सन्मान करण्यात आला. शिक्षक सक्षमीकरण स्पर्धेमध्ये शिक्षक-शिक्षिकांसाठी विविध कौशल्याधारित स्पर्धांचा समावेश करण्यात आला होता. त्यामध्ये वक्तृत्व,निबंध,१०० मीटर धावणे, रांगोळी, गीत गायन क्रिकेट,प्रश्नमंजुषा, शैक्षणिक साहित्य निर्मिती,



व्हिडिओ निर्मिती,फलक लेखन, स्वरचित कविता गायन, कथाकथन,चित्रकला,पोवाडा गायन,पुस्तक समीक्षा तसेच कागदकाम (कार्यानुभव)अशा विविध स्पर्धांचा समावेश होता. या स्पर्धांमुळे शिक्षकांच्या सर्वांगीण कौशल्यांना व्यासपीठ मिळाले. या प्रसंगी खेड तालुका गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले,शिक्षण विस्तार अधिकारी जीवन कोकणे,अनिता शिंदे तसेच विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.पुणे जिल्ह्या तील विविध तालुक्यांतील शिक्षक,केंद्रप्रमुख व अधिकारी यांचा उत्स्फूर्त सहभाग या स्पर्धेला लाभला.या यशामागे पुणे जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे , तसेच जुन्नर तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे,शिक्षण विस्तार अधिकारी विष्णू धोंडगे व केंद्रप्रमुख कमलाकांत मुंढे यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.यशवंत घोडे यांच्या यशाबद्दल शिक्षण क्षेत्रातील अधिकारी,कवी-लेखक, साहित्यिक मित्रपरिवार,शालेय व्यवस्थापन समिती (कुमशेत) अध्यक्ष व सदस्य,सरपंच, ग्रामपंचायत सदस्य,पालक, ग्रामस्थ,नातेवाईक,मित्रपरिवार, फोफसंडी येथील नोकरदार वर्ग, बिरसा कॉलनी आदिम मंडळ (बारव) तसेच विविध शिक्षक संघटनांकडून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# मोफत हृदयरोग शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

- मुदखेडचे भुमिपुत्र डॉ श्रीकांत भोसकर यांनी केले शेकडो रुग्णांची तपासणी

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

येथील पचलींग हॉस्पिटलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मोफत हृदयरोग निदान शिबिरास मुदखेड शहर व तालुक्यातून शेकडो रुग्णांनी हजेरी लावत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. श्रीकांत भोस्कर यांनी या शिबिरात रुग्णांची सखोल तपासणी करून मोलाचे मार्गदर्शन केले. मूळचे मुदखेडचेच सुपुत्र असलेले ग्लोबल हॉस्पिटलचे डॉ. श्रीकांत भोस्कर यांनी आपल्या जन्मभूमीप्रती असलेले सामाजिक ऋण मानून या भव्य शिबिराचे आयोजन केले होते. समाजाचे आपण काही देणे लागतो या भावनेतून मुदखेडमधील नागरिकांसाठी हे मोफत शिबिर



आयोजित केले असे डॉ. भोस्कर यांनी यावेळी नमूद केले.

अनेक चाचण्यांचे मोफत आयोजन करत डॉ. संदीप पचलींग यांच्या पुढाकाराने झालेल्या या शिबिरात प्रामुख्याने खालील लक्षणे असलेल्या रुग्णांची तपासणी करण्यात आले या मध्ये छातीत दुखणे किंवा जड वाटणे. दम लागणे, चक्कर येणे किंवा सतत घाम येणे. मळमळ, उलट्या आणि अस्वस्थता वाटणे. यासोबतच शुगर (मधुमेह) आणि बीपी (रक्तदाब) यांसारख्या महत्त्वाच्या चाचण्याही मोफत करण्यात आल्या. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. संदीप पचलींग आणि डॉ. रेणुका पचलींग यांनी विशेष परिश्रम घेत त्यांच्यासह हॉस्पिटलमधील कर्मचारी व शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरोग्य तपासणीसोबतच रुग्णांना हृदयविकारापासून बचावासाठी जीवनशैलीत काय बदल करावेत, याचेही मार्गदर्शन डॉक्टरांनी केले. या शिबीरात जवळपास दोनशे गोर गरीब रुग्णांना एसीजी व शुगर तपासणी केली असुन या रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# श्रीराम नवमी उत्सव उत्साहात साजरा

**ओतूर : (समर्थ गांवकरी)**

ओतूर ता. जुन्नर येथे श्रीराम नवमी विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. ओतूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसमोरील पुरातन राम मंदिरात, ओतूर गावठाणातील मुख्य बाजारपेठेतील लक्ष्मी नारायण मंदिरात, तसेच श्री कपर्दिकेश्वर मंदिरा जवळील राम मंदिरात श्रीराम नवमी निमित्त राम जन्मोत्सव व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. श्रीराम नवमीच्या पार्श्वभूमीवर ओतूर येथील पांढरी मारूती मंदीराच्या व्यासपीठावर बुधवारी दि. २५ रोजी सायंकाळी ६ वाजता ह.भ.प. मंगेश महाराज डुंबरे यांची प्रवचन सेवा पार पडली. सायंकाळी ७ वाजता जुने बसस्थानकावरील धर्मध्वज पुजन व गोमाता पुजन करण्यात आले.

# श्रीगोंदा शहराच्या वैभवात वेदराज डेव्हलपर्स प्रकल्पाची भर पडणार – प्रा. राम शिंदे

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

कष्टकरी, छोटे व्यापारी आणि महिला बचत गटांच्या आशीर्वादाने विठ्ठलराव वाडगे यांनी विविध क्षेत्रांत यश संपादन केले असून, त्यांच्या वेदराज डेव्हलपर्स प्रकल्पामुळे श्रीगोंदा शहराच्या वैभवात निश्चित भर पडेल, असा विश्वास विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केला.



श्रीगोंदा शहराजवळ उभारण्यात येणाऱ्या वेदराज डेव्हलपर्सच्या ५१ व्यावसायिक गाळे व ३४ निवासी फ्लॅट्सच्या प्रकल्पाचे भूमिपूजन प्रभू श्रीराम नवमीच्या औचित्याने गुरुवारी प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. प्रा. शिंदे पुढे म्हणाले की, काही वर्षांपूर्वी श्रीगोंदा शहराची मर्यादा तहसील कार्यालयापर्यंत होती आणि त्यापुढे वर्दळ नव्हती. मात्र, शहर व उपनगरांच्या विस्तारामुळे मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे. शहरात प्रवेश करताना वेदराज डेव्हलपर्सचा प्रकल्प लक्षवेधी ठरणार असून, येथे उभारण्यात येणारे ५१ व्यावसायिक गाळे महानगरांच्या धर्तीवर असावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच, शुभम वाडगे यांनी वडिलांच्या कार्यात सहभागी होऊन सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात पुढे यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी माजी आमदार राहुल जगताप, माजी जिल्हा परिषद सदस्या डॉ. सौ. प्रतिभा अक्का पाचपुते तसेच सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनीही आपल्या मनोगतातून विठ्ठलराव वाडगे यांच्या प्रकल्पाचे कौतुक करत अशा प्रकारचे प्रकल्प इतर ठिकाणीही उभारण्याची अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमास नगराध्यक्षा श्रीमती सुनीता खेतमाळीस, माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे, उपनगराध्यक्ष सौ. अलका अनभुले, नगरसेवक शहाजी खेतमाळीस, प्रशांत गोरे, अख्तर शेख, अमीन शेख, चैतन्य महिला बचत गट सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन सौ. रुक्मिणी वाडगे, अजय गावडे, लौकिक मेहता, श्री कन्स्ट्रक्शनचे महेश चौधरी, निलेश चौधरी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत चैतन्य स्टोन क्रशरचे संचालक शुभम वाडगे यांनी केले, तर वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटीच्या चेअरमन सौ. सायली वाडगे यांनी आभार मानले.

# झाडे लावा, संवर्धन करा; निसर्ग वाचवा – जगताप

**श्रीगोंदा: (समर्थ गांवकरी)**

"वन जपा, पृथ्वी वाचवा; उद्याचा श्वास आजच जपा. चला, मिळून एक वचन देऊ—वन वाचवू, पृथ्वी सुंदर करू," या ओळींतून जागतिक वनदिनाचे महत्त्व अधोरेखित करत झाडे लावण्यासह त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन सामाजिक वनीकरण विभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी पल्लवी जगताप-उंडे यांनी केले. त्या भानगाव येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. दि. २५ रोजी श्रीगोंदा तालुक्यातील भानगाव येथील श्री भानेश्वर विद्यालयात सामाजिक वनीकरण श्रीगोंदा कार्यालयातर्फे जागतिक वनदिन महोत्सव साजरा करण्यात आला. विभागीय वन अधिकारी अमोल जाधव तसेच सहायक वनसंरक्षक सोनल केसरकर (अहिल्यानगर) यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य शेलार सर होते. या निमित्ताने



## भानगाव शाळेत जागतिक वनदिन महोत्सव उत्साहात

चित्रकला व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. चित्रकला स्पर्धेत इयत्ता आठवीतील एकता नंदकिशोर कांबळे हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर प्रणाली दत्तात्रेय पवार द्वितीय, सिद्धी शरद कारंडे तृतीय, अक्षरा ज्ञानदेव महाडिक चतुर्थ आणि सिद्धी मारुती महाडिक पाचव्या क्रमांकावर राहिल्या. निबंध स्पर्धेत हर्षल मानसिंग कुदांडे प्रथम, सिद्धी शरद कारंडे द्वितीय, अक्षरा ज्ञानदेव महाडिक तृतीय, एकता नंदकिशोर कांबळे चतुर्थ आणि समीक्षा रामकृष्ण सरक पाचव्या क्रमांकावर राहिली. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धांसाठी शेलार एस. एम. व डमळे टी. के. (चित्रकला विभाग) तसेच महांडुळे डी. डी. व ठोंबरे आर. के. (निबंध विभाग) यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमादरम्यान वन विभागातर्फे विद्यार्थ्यांना अल्पोपहारही देण्यात आला. यावेळी एच. टी. गारुडकर (वनपाल), डी. बी. तोरडमल, निलाखे एस. आर. (वनरक्षक), बनसोडे व्ही. एम., किनकर (सामाजिक वनीकरण) आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राचार्य शेलार यांनी केले. "एक विद्यार्थी, एक झाड" ही मोहीम शाळेत सातत्याने राबविली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. वंदे मातरम या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# तामसा येथे रामनवमी निमित्त थंडपेयचे वितरण


**तामसा : (समर्थ गांवकरी)**

तामसा येथे प्रभू श्रीरामचंद्र यांच्या रामनवमीनिमित्त थंड शीत पेय चा वितरण करण्यात आलं. रामनवमीनिमित्त तामसा येथे रामभक्ताच्या वतीने शीतपेय रसनाचा वाटप करण्यात आलं. सामाजिक कार्यकर्ते राहुल सिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली रामनवमीनिमित्त शीतपेय रसना वितरण करण्यात आलं यावेळी धीरज सिंह ठाकूर , राम मुलावकर, शुभम रायपुलवार, प्रथमेश गाडगेराव, निखिल सोनमनकर, मारोती खोकले, गोविंद माळी, सचिन पवार, ओंकार गिरेवाड, गोपाल पांडवकर, संभाजी भाटेवाड, विकास मस्के, ऋषी मोपलवार, अंबाराव वानखेडे यांनी शीतपेय वितरण केलं.

# अर्थसंकल्पात अनेक कामांची तरतुद करावी - स्नेहा पाटील

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महानगरपालिकेच्या २०२६-२७ च्या विशेष अर्थसंकल्प सभेत नगरसेविका स्नेहा अमर पाटील यांनी दिवा शहरातील अनेक महत्वाच्या कामांची मागणी करुन या कामांसाठी अर्थसंकल्पात अंतर्भाव व तरतुद करण्याची मागणी व सुचना केली. त्यात दिवा पुर्व - पश्चिमला जोडणारा उड्डाणपुल अनेक वर्षापासुन प्रलंबित असून काही जमिन हास्तांतर न झाल्यामुळे पुलाचं काम धिम्या गतीने सुरु आहे . यामुळे जमिन मालकांना योग्य तो मोबदला देऊन हास्तंतर प्रक्रिया जलदगतीने पुर्ण करावे, मुंब्रा फायर स्टेशन ते दिवा शिळ रोड रसत्याचे बांधकाम करून रस्ता खुला करण्यात यावा. दिवा -शिळ रोडवर छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ बस स्टॉप तात्काळ बांधण्यात यावा, अनेक नाले जे शहरातुन खाडीकडे जातात त्या पाण्याचा निचरा योग्या रितीने दृष्टीने पुनर्बांधणी करणे. मच्छी मार्केटसाठी योग्य जागा



नियोजित करुन मार्केट बांधणे, मलःनिसाराण योजने अंतर्गत कामे तात्काळ करणे. दिवा पश्चिमला पाणी पुरवठा करण्यासाठी पुश थ्रु जलवाहिनी तात्काळ टाकणे. प्रलंबित ठिकाणी एल.ई.डी पथदिवे लावणे व दुरुस्थ करणे. दिवा शहरासाठी एक मॅकेनिकल स्वीपर मशिनसाठी तरतुद करून सफाई कामगारांची संख्या वाढविण्यात यावी. दिवा क्षेपणभूमीवर शास्त्रेक्त पध्दतीने प्रक्रिया केली जात आहे , पण रोज रात्री या क्षेपणभुमिवर आग लागते व त्यामुळे परिसरात धुराचे लोण पसरते ज्याचा परिणाम रहिवाशांच्या आरोग्यावर होत आहे . या क्षेपणभुमीवर आणाखी चांगल्या प्रकारे प्रक्रिया कशी करता येईल याकडे लक्ष देणे. शहरातील वातावरण आरोग्यदायक करण्याचा दृष्टीनं एक पाऊल पुढे म्हणुन शहरातील मुख्य दिवा-शीळ रोड सह मुख रसत्यांवर वृक्ष लागवड करण्यासाठी तरतुद करणे. नगरसेविका स्नेहा अमर पाटील यांनी दिवा शहरातील अनेक महत्वाच्या कामांची मागणी करुन या कामांसाठी अर्थसंकल्पात अंतर्भाव व तरतुद करण्याची मागणी व सुचना केली.

# गोदावरी नदी पात्रात पोलीस व महसूल पथकांची कारवाई

- १ कोटी ३१ लाख रुपयांच्या फायबर बोट व इंजिन जिलेटीन स्फोटाने उध्वस्त

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

मुदखेड तालुक्यातील गोदावरी नदीच्या पात्रातून अवैध वाळू उपसा करणारे घाटावर पोलिस व महसूल विभागाच्या पथकाने धाड टाकून १ कोटी ३१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दरम्यान अवैध वाळू उपसा करणारे साहित्य जिलेटीन स्फोटाने उध्वस्त केले आहे. मुदखेड तालुक्यातील मुगड येथील गोदावरी नदीच्या पात्रातून अवैध वाळू उपसा करत असल्याची गुप्त माहिती महसूल व पोलिस पथकाला मिळाली. मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक धिरज चव्हाण व महसूल पथकाने मुगट येथील गोदावरी नदी पात्रात धाड टाकली. त्यावेळी अवैध वाळू उपसा करणारे सर्व पोलिसांना पाहून पळून गेले. मुदखेड पोलीस व महसूल विभागाच्या पथकाने मुगट येथील वाळू घाटावरुन अवैध वाळू उपसा करण्यासाठी लागणारे पाच लोखंडी फायबर बोट, एक इंजिन, ३५ ब्रास वाळू असा १ कोटी ३१ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

त्यानंतर पोलिसांनी सदर मुद्देमाल हा जिलेटीन स्फोटाने उध्वस्त करून टाकला आहे. सदरील कारवाई पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलिस अधिक्षक सुरज गुरव, उपविभागीय अधिकारी संजिवन मिरकले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक धिरज चव्हाण व महसूल पथकाने केली आहे.

# पंचायत समिती अंबरनाथ येथे आढावा बैठक व विकास कामांची पाहणी

## ग्रामपंचायत रहाटोली येथे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांची भेट

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

आज, दिनांक २६ मार्च २०२६ रोजी जिल्हा परिषद ठाणे यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव (भा. प्र. से.) यांनी तालुका अंबरनाथ येथील ग्रामपंचायत रहाटोली येथे भेट देऊन मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध विकास कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. या भेटीदरम्यान गावातील पायाभूत सुविधा, स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा योजना, घरकुल (आवास) योजना, महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना, रस्ते विकास कामे तसेच इतर प्रगतिपथावरील उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संबंधित कामांची



गुणवत्ता, वेळेत पूर्णता आणि नागरिकांना मिळणारे प्रत्यक्ष लाभ याबाबत समाधान व्यक्त करत काही कामांमध्ये सुधारणा करण्यासाठी आवश्यक त्या सूचना ग्रामपंचायत पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या. यावेळी ग्रामविकास अधिक प्रभावी करण्यासाठी पारदर्शकता, जनसहभाग आणि योजनांची परिणामकारक अंमलबजावणी यावर विशेष भर देण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले. ग्रामपंचायतीने केलेल्या विकास कामांचे कौतुक करत भविष्यातही अशाच पद्धतीने विकासात्मक उपक्रम राबविण्याचे आवाहन त्यांनी केले. या पाहणीवेळी गटविकास अधिकारी पंचायत समिती अंबरनाथ अजित देसाई, ग्रामपंचायत सरपंच तथा प्रशासक राजश्री रुपेश रेवाळे, ग्रामपंचायत अधिकारी दिनेश गणपत वारघडे, जिल्हा परिषद शाळा रहाटोलीचे मुख्याध्यापक शिरसाठ, अंगणवाडी सेविका, महिला बचतगट प्रतिनिधी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पंचायत समिती अंबरनाथ येथे भेट देऊन विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. या आढावा बैठकीत आरोग्य, पशुसंवर्धन, बांधकाम, घरकुल योजना, मनरेगा, ग्रामीण पाणीपुरवठा, शिक्षण, अर्थ, उमेद, कृषी व सामान्य प्रशासन या विभागांतील प्रगतीचा आढावा घेण्यात आला. आरोग्य विभागांतर्गत आरोग्यविषयक सेवा, पशुसंवर्धन विभागांतर्गत इमारती व श्वान प्रतिबंधक योजना, बांधकाम विभागांतर्गत नागरी व जनसुविधा, घरकुल योजनांतर्गत प्रधानमंत्री आवास व जनमन आवास योजना, मनरेगा अंतर्गत कामांची स्थिती, ग्रामीण पाणीपुरवठा व जलजीवन मिशन, स्वच्छ भारत अभियान, शिक्षण विभागातील शाळांची स्थिती व रिक्त पदे, तसेच कृषी व बचतगटांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेण्यात आला.

तसेच पंचायत समिती कार्यालयाची पाहणी करताना महिला कक्ष, अभिलेख कक्ष, वाहनचालक कक्ष, बायोमेट्रिक हजेरी प्रणाली तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या सभागृहाची पाहणी करून आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. या आढावा बैठकीस गटविकास अधिकारी अजित देसाई, सहाय्यक गटविकास अधिकारी निता खोटरे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विलास फाटक, उपअभियंते संजय सूर्यवंशी व अमित शिंदे, गटशिक्षणाधिकारी विशाल पोतेकर, बाल विकास प्रकल्प अधिकारी योगेश येंदे, तालुका आरोग्य अधिकारी अर्चना मोहिते, कृषी अधिकारी प्रज्ञा गवई, विस्तार अधिकारी (सांख्यिकी) प्रदीप मोहेकर, सहाय्यक प्रशासन अधिकारी दिपक चौगुले, सहाय्यक लेखाधिकारी बालाजी बरकडे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. एकूणच या दौऱ्याद्वारे ग्रामपातळीवरील विकास कामांची प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासन अधिक परिणामकारक व उत्तरदायी बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# केंद्र सरकारची रॉकेल वाटपास मंजुरी

## प्रत्येक कुटुंबाला किती लिटर केरोसीन ?

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीचा सामना देशातील सर्वसामान्य नागरिकांनाही बसत असून गॅसटंचाईमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. एकीकडे गॅस एजन्सीमध्ये गॅस पुरवठ्याबाबत काही नियमावली तयार करण्यात आली असून व्यावसायिक गॅस पुरवठाही बंद करण्यात आला आहे. त्यातच, आता युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाचं पाऊल उचललं असून केंद्र सरकारकडून ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपास राज्याला मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे, गॅस आल्यानंत कुठेतरी कोपऱ्यात पडलेला स्टोव्ह आता पुन्हा बाहेर काढावा लागणार आहे.

राज्यातील शिधापत्रिका धारकांना ३ लिटर केरोसीन मिळणार आहे.

प्रति कुटुंब किंवा शिधापत्रिका असलेल्यांना एका शिधापत्रिकेमागे ३ लिटर केरोसीन मिळणार आहे. एलपीजी तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून तात्पुरता स्वरुपात केरोसीन वाटप केले जाणार असल्याची माहिती आहे.

राज्य सरकारकडून जिल्हानिहाय आवश्यक केरोसीन वितरण निश्चित केले असून मार्च-एप्रिल २०२६ मध्ये राज्यात तिन्ही सरकारी तेल कंपन्यांकडून केरोसीन वाटप केले जाणार आहे. एकूण वाटपाच्या ८५ टक्के केरोसीन पहिल्या पंधरवड्यात सोडण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. त्यामुळे, ज्या कुटुंबाकडे



शिधापत्रिका आहे, त्यांना प्रत्येक कुटुंबास 3 लिटर केरोसीन मिळणार आहे. तर, ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही असे कुटुंब देखील केरोसीन उपलब्धतेनुसार केरोसीन वितरणास पात्र राहतील. प्रतिसादाच्या अनुषंगाने श्वेतपत्रिकाधारक देखील केरोसीन मिळण्यास पात्र असतील असे समजते. आखाती देशातील इराण



आणि अमेरिका, इस्रायल युद्धाचा परिणाम जागतिक बाजारपेठेवर होत असून तेल आणि इंधन पुरवठा अपुरा पडत असल्याचे दिसून येते. घरगुती ग्राहकांना कुठलीही अडचण भासणार नाही, यासाठी शासनाकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देखील संसदेत बोलताना कोरोनासारख्या परिस्थितीसाठी आपण सज्ज राहायला हवं असे आवाहन देशावासीयांना केले आहे. त्यातच, गॅसटंचाईच्या पार्श्वभूमीवर आता सरकारकडून केरोसीन वितरणास परवानगी देण्यात आली आहे.

# ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा आयुष सेवांचा अधिक व्यापक अंमलबजावणी बळकट करा

## खा. लंके यांची संसदेत मागणी



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

देशातील आयुष क्षेत्र अधिक सक्षम व व्यापक करण्यासाठी खासदार नीलेश लंके यांनी आयुष मंत्रालयाच्या सल्लागार समितीच्या बैठकीत सक्रिय सहभाग नोंदवत विविध महत्त्वाचे मुद्दे ठामपणे मांडले. सदर बैठकीत आयुर्वेद, योग, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी या उपचार पद्धतींचा देशभर विस्तार, तसेच या सेवा ग्रामीण व दुर्गम भागांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. खासदार लंके यांनी जनतेच्या अपेक्षा, अडचणी आणि आयुष सेवांतील मर्यादा यांची थेट मांडणी करत आवश्यक सुधारणा करण्याची गरज अधोरेखित केली.

विशेषतः ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा मजबूत करण्यासाठी आयुष सेवांचा अधिक व्यापक वापर, प्रशिक्षित मनुष्यबळाची उपलब्धता, तसेच योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर त्यांनी भर दिला. बैठकीदरम्यान खासदार लंके यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी मंत्रालयाच्या विविध योजनांचा आढावा सादर केला. तसेच आयुष क्षेत्राच्या विस्तारासाठी राबविण्यात येणाऱ्या धोरणात्मक उपक्रमांची माहिती दिली.

# भूषण शिरसाठची जयपूरमध्ये चमकदार कामगिरी !

- अंतरराज्य क्रिकेट स्पर्धेत पटकावले रौप्यपदक

**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**

मनामध्ये परिश्रम आणी काही तरी करुन दाखविण्याची जिद्द असल्यास नक्कीच यशाचं शिखर गाठता येते हे देसवंडी ( ता.राहुरी) येथील इयत्ता ९ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या चि. भुषण शिरसाठ याने आपल्या कर्तबगारीतून दाखवून दिले. सविस्तर असे की, राजस्थानमधील जयपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतरराज्य क्रिकेट स्पर्धेत देसवंडी (ता. राहुरी) येथील नववीत शिकणाऱ्या भूषण ज्ञानेश्वर शिरसाठ याने अष्टपैलू कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला आहे. त्याच्या या यशामुळे देसवंडी गावच्या आणि शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून ग्रामीण भागातील एका खेळाडूने



थेट राजस्थानमधील जयपूर याठिकाणी आपल्या कौशल्याची मोहोर उमटवली आहे.

भूषण हा देसवंडी (ता.राहुरी जि.अहिल्यानगर ) येथील स्थानिक शाळेत इयत्ता ९ वी मध्ये शिक्षण घेत आहे. त्याला लहानपणापासूनच क्रिकेटची आवड असून नाशिक येथील क्रिकेट प्रशिक्षकांकडे तो सध्या शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेत आहे. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्याने आपल्या खेळात कमालीची सुधारणा केली, ज्याचा प्रत्यय जयपूरमधील मैदानावर आला.

अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या सामन्यांमध्ये भूषणने आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर संघाला उपविजेतेपद मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला.

भूषणचे वडील श्री. ज्ञानेश्वर भाऊसाहेब शिरसाठ (माऊली फोटोग्राफर) आणि त्याच्या मातोश्रींनी आपल्या मुलाच्या खेळातील प्रगती ओळखून, कुठलाही संकोच न बाळगता त्याला लांबच्या प्रवासासाठी आणि स्पर्धेसाठी जयपूरला पाठवण्याचा निर्णय घेतला. ग्रामीण भागातील पालकांनी खेळाप्रती दाखवलेला हा सकारात्मक दृष्टिकोन भूषणच्या यशासाठी मैलाचा दगड ठरला आहे.



# शंकर संताजी गोरे यांचे निधन

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील केशवराज नगर येथील रहिवासी प्रगतशील शेतकरी शंकर संताजी गोरे (वय ५२ वर्ष ) यांचे हृदयविकाराने दि.२६ गुरुवार रोजी दुपारी ४ वा. निधन झाले आहे. त्यांच्यावर दि.२७ शुक्रवारी रोजी स. १०- ३० वा. माळी समाज स्मशान भूमी अर्धापूर येथे अंत्यस्कार करण्यात येणार आहे . त्यांच्या पश्चात पत्नी,५भाऊ, बहीण,२मुले,पुतणे,सूना, नातवंडे असा परिवार आहे. ते डिंगाबर गोरे,विश्वांबर गोरे,बाबुराव गोरे यांचे बंधू होत.

# जनगणना प्रक्रियेत प्रत्येक अधिकारी- कर्मच्याऱ्यांनी आपली जबाबदारी अचूकपणे पार पाडावी -जिल्हाधिकारी राहुल कर्डीले

## जनगणना २०२७ प्रशिक्षण कार्यशाळेस सुरुवात; नागरिकांना स्व-गणनेची सुविधा

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

जनगणना हे राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत महत्त्वाचे कार्य असून, देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नियोजनासाठी संकलित डेटा महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे या प्रक्रियेत सहभागी प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी अचूकपणे पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी राहुल कर्डीले यांनी दिले. कै. डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन येथे जनगणना २०२७ अनुषंगाने आयोजित तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्‌घाटन आज करण्यात आले. यावेळी जनगणना संचालनालयाचे सहायक संचालक वीरेंद्र दीक्षित, सांख्यिकी अधिकारी



मयूर पवार व नेहाल धुरंधरे यांनी जनगणनेची पार्श्वभूमी, प्रक्रिया व संकल्पना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यशाळेत जनगणना प्रक्रियेचा पाया, अधिकारी-कर्मचाऱ्यांची भूमिका, तसेच पहिल्या टप्प्यातील घरयादी व ३४ मुद्द्यांवरील माहिती संकलन याबाबत प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी झेनितचंद्र र दोनतुला, अनन्या रेड्डी, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ अधिकारी, मनपा उपायुक्त अभिजीत वायकोस, तहसीलदार विपीन पाटील यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व चार्ज अधिकारी तथा तहसीलदार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी सांगितले की, जनगणना दोन टप्प्यांत होणार आहे. पहिल्या टप्प्यात घरयादी व गणना, तर दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्या गणना केली जाईल.

१६ मे ते १५ जून २०२६ या कालावधीत प्रगणक घरभेटी देऊन माहिती संकलित करतील.

यापूर्वी १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत नागरिकांना स्व-गणना करण्याची सुविधा उपलब्ध असणार असून, मोबाईलच्या माध्यमातून संकेतस्थळावर माहिती भरता येणार आहे.

डिजिटल तंत्रज्ञानाच्या साहाय्याने होणाऱ्या या जनगणनेत नागरिकांनी अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन नांदेड जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# गाळमुक्त धरण – गाळमुक्त शिवार योजनेअंतर्गत कामाला सुरुवात

## जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते शुभारंभ

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील पार्डी (मक्ता) - निमगाव शिवारात असलेल्या सिंचन तलावातील गाळ काढण्याचे काम गावालगत वाहणाऱ्या नदीतील गाळ काढून ती गाळमुक्त करण्याचे काम हाती घेण्यात आले असून,भविष्यात या परिसरातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न व शिवारातील शेतकऱ्यांचा शेतीसाठी सिंचनाचा पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

मृद व जलसंधारण विभाग,महाराष्ट्र शासन आणि नाम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गाळमुक्त धरण –गाळमुक्त शिवार योजनेअंतर्गत या जलसंधारण कामास सुरुवात करण्यात आली आहे.या उपक्रमाचा शुभारंभ नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी लोकप्रतिनिधीं,गावकरी व संबंधित विभागाचे अधिकारी,कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या योजनेअंतर्गत धरण,तलाव व नदीपात्रात साचलेला गाळ काढून जलसाठवण क्षमता वाढविण्याचा उद्देश आहे.गाळ काढल्यामुळे पाणीसाठ्यात वाढ होणार असून परिसरातील शेती,सिंचन आणि पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेत सुधारणा होणार आहे. हा उपक्रम शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरणार असून आगामी काळात या भागातील पाण्याची टंचाई दूर होण्यास मदत होईल. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ,मंडळ अधिकारी नवीन रेड्डी, कृषी बाजार समितीचे संचालक निळकंठराव मदने,सरपंच शोभाबाई कांबळे,आशिष खडसे



उपविभागीय अभियंता,जलसंधारन अधिकारी अक्षय सोलसे,तलाठी लक्ष्मणराव देशमुख,दयासागर गायकवाड,नाम फाउंडेशन चे समन्वयक गणेश गायकवाड,उमेश पाटील,माजी सरपंच मारोतराव देशमुख, ग्रामसेवक शिवकुमार देशमुख,यांची प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी राहुल कर्डीले म्हणाले कि,नदीतील गाळ काढण्याची संकल्पना पारदर्शकपणे यशस्वी करू,शेतकर्यांना सिंचनासाठी व नागरीकांचा पीण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटतो,बहुउपयोगी हे काम आहे,त्यांनी फाऊंडेशनचे कौतुक केले.ग्रामपंचायतीने नदीवरील बंधारा अतिवृष्टीमुळे फुटल्यामुळे दुरूस्तीची मागणी केली.ही मागणी जिल्हाधीकार्यांनी करण्याचे आश्वासन दिले.यावेळी हनुमंत देशमुख,प्रसाद हापगुंडे,गोविंद देशमुख,नंदकुमार देशमुख,विठ्ठल देबगुंडे,शंकर हापगुंडे,सुनिल आप्पा मरकुंदे,किरण भांगे,इनुस नदाफ,महेश देशमुख,काशीनाथ हापगुंडे,देवीदास कांबळे,साहेबराव हापगुंडे,रवी पत्रे,शिवशंकर दहिभाते, यांच्यासह आदिंची उपस्थीती होती.

# २७, २८ रोजी 'सायन्स ऑफ फ्लाइट' प्रदर्शन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

विमानशास्त्राविषयी सर्वसामान्यांमध्ये कुतूहल निर्माण करण्यासोबतच उड्डाणाच्या विज्ञानाची सखोल ओळख करून देणारे 'सायन्स ऑफ फ्लाइट' हे अनोखे प्रदर्शन २७ व २८ मार्च २०२६ या दोन दिवशी पाषाण येथील अरोमी येथे होणार आहे. एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया पुणे आणि प्रसिद्ध एरो मॉडेलर माधव खरे यांच्या संयुक्त विद्यमाने हे प्रदर्शन भरविण्यात येत आहे. सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत सर्वांसाठी खुले असलेल्या या प्रदर्शनासाठी प्रवेश मोफत असून, नोंदणी अनिवार्य आहे. 'सायन्स ऑफ फ्लाइट' प्रदर्शनातून प्राचीन काळापासून आधुनिक युगापर्यंतच्या उड्डाण यंत्रांच्या विकासाची सविस्तर आणि चित्रमय कथा उलगडणार आहे.

# जय जय श्रीरामाच्या जयघोषाने अर्धापूर दुमदुमले

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

भगव्या टोप्या घातलेली तरूणाई पारंपरिक वेशभूषेतील रामभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग आणि प्रभू श्रीरामाच्या देखाव्यासह श्रीराम नवमीनीमीत्त शहरात श्रीराम जन्मोत्सव समीतीच्या वतीने शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी जय श्रीरामाच्या जयघोषाने अर्धापूर नगरी दुमदुमली होती.

दि.२६ गुरुवारी रोजी म.बसवेश्वर चौकात श्रीराम मुर्तीची पुजा करीत हार घालून महाआरती करण्यात आली. म.बसवेश्वर चौक येथून शोभायात्रेला सुरुवात झाली. एका वाहनावर ठेवलेली प्रभू श्रीरामाची आकर्षक मूर्ती लक्ष वेधून घेत होती. त्यासमोर ढोल पथक, प्रभू श्रीराम, हनुमान यांची प्रतिकृती, भजनी यांचा शोभायात्रेत समावेश होता. त्याचबरोबर ढोल पथकांच्या तालावर व डीजेच्या तालावर तरुणाईने ठेका धरला होता.पु.अहिल्यादेवी होळकर



चौक शहरातील प्रमुख मार्गावरून श्रीहनुमान मंदिर येथे आली. त्यानंतर आरती करून समारोप करण्यात आला शोभायात्रेत श्रीराम भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. याप्रसंगी पोनि चंद्रशेखर कदम यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. प्रत्येक चौकात भगव्या पताका लावण्यात आल्या होत्या. जणूकाही अयोध्यानगरीच अर्धापूर शहरात अवतरली, असा भास होत होता. शोभायात्रेत श्रीराम भक्त व चिमुकले बालगोपाल मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. यावेळी युवानेते अभिषेक गुरखेल यांनी खिचडी तर सखाराम वारकड यांनी पाण्याची व्यवस्था केली होती. श्रीराम जन्मोत्सवाची शोभायात्रा यशस्वी करण्यासाठी उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले

# माधव एडके यांना न्याय चक्र गौरवपुरस्कार जाहीर

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

लोक जनजागृती संस्थेच्या वतीने दिला जाणारा मानाचा न्याय चक्र पुरस्कार पत्रकार माधव एडके यांना जाहीर कण्यात आला आहे. या संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार सितळे यांनी निवडीचे सन्मानपूर्वक पत्र देवून दि.२९ मार्च रोजी पुरस्कार वितरण कार्यक्रमास सहकुटुंबासह उपस्थित राहवून पुरस्कार स्वीकारण्यासाठी आमंत्रित केले आहे.



बिलोली तालुक्याचे भूमिपुत्र माधव शंकरराव एडके यांनी मागील वीसवर्षापासुन पत्रकार क्षेत्रात विविध वृतपत्र व वृत्त वाहिनीच्या माध्यमातून सामाजिक दूरदृष्ट्या शोषित व शेतकऱ्यांच्या विविध समस्या बाबत दखल घेऊन आपल्या लेखणीच्या माध्यमातून उल्लेखनीय कामगिरी बजावून न्याय देण्याचे कार्य केले आहे.या कार्याची लोक जनजागृती संस्थेने दखल घेत माधव एडके यांना मानाचा न्यायचक्र गौरवपुरस्कार जाहीर केला आहे. यापुरस्काराचे वितरण २९ मार्च रोजी नांदेड येथील देवकृपा फंक्शन हॉल छत्रपती चौक येथे लोक जनशक्ती पक्षाचे खा.अरुण भारती यांच्या हस्ते व प्रदेशाध्यक्ष प्रमोद कुदळे यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थित हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आाहे. एडके यांची न्याय चक्र पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल बिलोली तालुक्यातून पत्रकार व सामाजिक स्तरावरून माधव एडके यांचं अभिनंदन केले जात आहे.

# नांदेड शहरात रामनवमी निमित्त श्रीरामाची शोभा यात्रा उत्साहात

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

श्रीराम नवमीनिमित्त आज नांदेड शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली गाडीपुरा येथील रेणुका माता मंदिरापासून दुपारी ही शोभा यात्रेची सुरुवात झाली. त्यात राम रावण युद्ध झांकी, भगवान नृसिंह अवतार, ऑपरेशन सिंदूर झांकी, भोलेनाथ व साधू महात्म्यांचे देखावे, आयोध्यातील रामलल्ला मूर्ती, गोमाता प्रतिमा अदींसह अनेक देखावे सादर करण्यात आले होते. उत्साहाच्या वातावरणात 'जय श्रीराम'च्या घोषणांनी नांदेड शहर दुमदुमून गेले होते.

गेल्या १७ वर्षांपासून सुरू असलेल्या परंपरेनुसार दि २६ मार्च रोजी श्रीराम नवमीनिमित्त प्रथम राम घाट येथील श्रीराम मंदिरात महाआरती करण्यात आली, त्यानंतर प्रभू श्रीराम यांच्या मूतीर्चे संतांच्या हस्ते अनावरण करण्यात



आले या महाआरतीसाठी रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते महाआरती संपताच जय श्रीराम, जब सियाराम, बजरंग बली की जय च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. त्यानंतर भर उन्हात मोठया प्रमाणात भव्य शोभायात्रा जुना मोंढा टावर, ते संत बाबा निधानसिंह गुरुद्वारा चौक, महावीर चौक, हनुमान पेठ वजीराबाद, कला मंदिर, शिवाजीनगर, महात्मा फुले पुतळा . श्रीनगर, वर्कशॉप मार्गे अशोक नगर येथील श्रीराम मंदिर कडे जाण्यासाठी सुरू इवली. या शोभायात्रेत राम रावण युद्ध झांकी, भगवान नृसिंह अवतार, ऑपरेशन सिंदूर, भोलेनाथ व साधू महात्म्यांचे देखावे, अयोध्येतील रामलल्ला मूर्ती, गोमाता प्रतिमा, तरुण-तरुणींचे ढोल ताशांचे पथक, जटायूचा जिवंत देखावा, वानर सेनेचा देखावा, राम रथाचा देखावा, श्रीराम चरित्रावरील विविध देखावे यांचा समावेश होता. या शोभा यात्रेमध्ये रामभक्तांनी दिलेल्या श्रीरामचंद्र की जय, जय सियाराम, पवनपुत्र हनुमान की जय, हर हर महादेव च्या घोषणेने शहर दणाणून गेले. या शोभा यात्रेदरम्यान जुना मोंढा टॉवर, गुरुद्वारा चौक, हनुमान पेठ वजीरावाद, कला मंदिर, शिवाजीनगर, महात्माफुले पुतळा या भागात विविध प्रकारचे स्टॉल लावण्यात आले होते. त्यात अनेक सामाजिक संघटनांनी महाप्रसाद, खिचडीचे वाटप, मट्ठा, ज्यूस, बुंदी, आमरस, पाणपोईची व्यवस्था केली होती तेथे शोभायात्रेत सहभागी झालेले रामभक्त त्याचा आस्वाद घेत होते. तसेच गुरुद्वारा चौरस्ता व वजीराबाद मार्गे

भागात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तेथे डॉक्टर व त्यांचे सहाय्यक रक्तदात्यांकडून रक्तांचे संकलन करीत होते. तेथेही रक्तदानासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. शोभायात्रे दरम्यान शोभा यात्रेचे स्वागत करण्यासाठी विविध ठिकाणी मंच उभारून पुष्पहार व फुलांद्वारे त्यांचे स्वागत करण्यात येत होते. त्यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते शांततेत तसेच उत्साहात शोभायात्रा पार पाडण्यासाठी हजारो स्वयंसेवक परिश्रम घेताना दिसत होते. डीजेच्या व ढोल ताशांच्या तालावर रामभक्त नृत्य करताना दिसत होते. या शोभा यात्रेनिमित्त पोलीस प्रशासनाच्या वतीने कड़क बंदोबस्त करण्यात आला होता. प्रत्येक चौकात पोलिसांनी बंदोबस्त ठेवला होता.

शोभायात्रेपुर्वी आ. बालाजी कल्याणकर, आ. बोंढारकर, पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, भाजप राज्य उपाध्यक्ष चैतन्यवापू देशमुख, उपमहापौर दिपकसिंह रावत यांच्यासह अनेकांनी आरती केली. तर भाजपचे प्रविण साले यांनी शहरातून दुचाकी रॅली काढली होती.

# सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे : गिरीश महाजन



**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

दि जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसची वाढती मागणी लक्षात घेता पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन, तेल कंपन्या व वितरकांनी समन्वयाने कार्य करावे. कोणत्याही आफवांवर विश्वास न ठेवता नागरिकांनी अनावश्यक गर्दी व इंधन साठेबाजी टाळून संयम बाळगावा, असे आवाहन कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात पेट्रोल-डिझेल व गॅस सिलेंडर वितरक, कंपनीचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत मंत्री श्री. महाजन बोलत होते. यावेळी महापौर हिमगौरी आडके-आहेर, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, स्थायी समिती सभापती मच्छिंद्र सानप, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी रमेश गायकवाड यांच्यासह विविध तेल कंपन्या, गॅस वितरक यांचे प्रतिनिधी, अधिकारी उपस्थित होते. मंत्री महाजन म्हणाले की, सध्या पेट्रोल-डिझेलची मागणी दीडपट वाढल्यामुळे काही ठिकाणी तात्पुरती कृत्रिम टंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. नागरिकांनी घाबरून न जाता इंधन साठविणे टाळावे. कोणत्याही स्वरूपाचे वाद होणार नाहीत याद्दष्टीने पंपावरील कर्मचाऱ्यांनी ग्राहकांशी नम्रतेने व संयमाने वागण्याच्या सूचना मंत्री श्री. महाजन यांनी दिल्या.

दक्षता पथकाच्या कारवाईत आवश्यक ती शिथिलता आणून नागरिकांना दिलासा देण्यात आला आहे. पुरवठा नियमित झाल्यास प्रतीक्षा यादी निश्चितच कमी होईल. वेल्डिंग इंडस्ट्री, ऑटोमोबाईल संबंधित काही उद्योगांवर तात्पुरता परिणाम झाला असल्याचे जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी नमूद केले.

घरपोच सिलिंडर वितरणास विलंब होत असून बायोमेट्रिक ई-केवायसी झालेल्या ग्राहकांना प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्लांट सुट्टीच्या दिवशी बंद राहत असल्याने वितरणावर परिणाम होत आहे. ओटीपी-आधारित वितरण पद्धत प्रभावीपणे राबविल्यास गर्दी कमी होऊ शकते, असे गॅस वितरकांनी बैठकीत सांगितले. घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत आहे, मात्र व्यावसायिक सिलिंडरमध्ये काही प्रमाणात अडचणी आहेत. अतिरिक्त पुरवठा केल्यास प्रतीक्षा यादी कमी होण्यास मदत होईल असे तेल कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी सांगितले

नेहमीपेक्षा अधिक पुरवठा करूनही अफवांमुळे काही तासांतच इंधन संपत आहे. काही ठिकाणी साठेबाजीमुळेही ताण वाढला आहे. प्रत्यक्षात पुरवठा पुरेसा असून नागरिकांनी अनावश्यक गर्दी टाळावी असे कंपनी प्रतिनिधींनी यावेळी सांगितले.

**पेट्रोल-डिझेल वितरकांनी बैठकीत पुढील मागण्या मांडल्या**

- ऑईल कंपन्यांकडील क्रेडिट सुविधा पुन्हा सुरू करावी
- आगाऊ रक्कम भरल्यानंतर तात्काळ टँकर उपलब्ध करून द्यावेत
- रविवारीही डेपो सुरू ठेवावेत
- पंपांवर पोलीस संरक्षण द्यावे

# सेप्ट युनिव्हर्सिटीकडून बिल्डिंग एनर्जी कोर्ससाठी अर्ज सुरू

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

CEPT UNIVERSITY

सेप्ट युनिव्हर्सिटीच्या तंत्रज्ञान विद्याशाखेमार्फत उपलब्ध असलेल्या 'मास्टर्स इन बिल्डिंग एनर्जी परफॉर्मन्स (एमबीईपी)' या दोन वर्षांच्या, पूर्ण-वेळ पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेशासाठी विद्यापीठाने अर्ज मागविले आहेत. अर्ज स्वीकारण्याची मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत आहे. एमबीईपी कार्यक्रम हा काटेकोर वातावरणनिर्मिती (सिम्युलेशन), प्रयोग आणि प्रणालींच्या आकलनाद्वारे ऊर्जा-कार्यक्षम इमारतींची रचना आणि हवामानाला प्रतिसाद देणाऱ्या वास्तुकलेवर केंद्रित आहे. बांधकाम व पर्यावरणार लक्ष केंद्रित करणारा हा भारतातील एकमेव कार्यक्रम आहे. हवामान आणि इमारतीच्या कार्यक्षमतेच्या आव्हानांशी संबंधित कन्सल्टिंग, संशोधन, व्यावसायिक कार्य आणि धोरण या क्षेत्रांमध्ये करिअर करण्याची इच्छा असणारे पदवीधर या एमबीईपी अभ्यासक्रमातून घडणार आहेत. इमारतींची ऊर्जा कार्यक्षमता वाढवणे हा विषय गेल्या तीन दशकांहून अधिक काळापासून राष्ट्रीय प्राधान्याचा राहिलेला आहे. यासाठी अशा व्यावसायिकांची गरज आहे जे इमारतींमधील गुंतागुंतीचे ऊर्जा प्रवाह आणि प्रणाली समजू शकतील आणि किफायतशीर, कार्यक्षमतेवर आधारित, परवडणारे व विस्तारक्षम उपाय सुचवू शकतील. सेप्ट युनिव्हर्सिटीचा 'मास्टर्स प्रोग्राम इन बिल्डिंग एनर्जी परफॉर्मन्स' (एमबीईपी) हा अभ्यासक्रम ही गरज पूर्ण करतो. वास्तुकला, इमारत अभियांत्रिकी, इमारत भौतिकशास्त्र, मानवी शरीरशास्त्र आणि मानसशास्त्र यांसारख्या विविध क्षेत्रांना एकत्रित करणाऱ्या एका कठोर, आंतरविद्याशाखीय शिक्षण 'प्रयोगशाळे'द्वारे हे साध्य करण्यात येते. हा दोन वर्षांचा अभ्यासक्रम विविध पार्श्वभूमीच्या (वास्तुकला, स्थापत्य आणि यांत्रिक अभियांत्रिकी) विद्यार्थ्यांसाठी तयार केलेला आहे. याअंतर्गत वास्तविक जगातील प्रकल्प आणि एकात्मिक डिझाईन सरावांच्या माध्यमातून वाढत्या प्रमाणात कौशल्य वाढविण्यात येते. या अभ्यासक्रमाला सेप्टच्या कॅम्पसमधील अनेक अत्याधुनिक प्रयोगशाळा सुविधांचे पाठबळ लाभले आहे.

# बीएनसीएमध्ये बांधकाम क्षेत्रासाठी उपयुक्त 'बिल्ट एनव्हायरमेंट' अभ्यासक्रम सुरू




**पुणे : (समर्थ गांवकरी)**

उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील सहकार्य मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ.भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनमध्ये (बीएनसीए) बिल्ट एनव्हायरमेंट (बांधकाम पर्यावरण) यावरील एक वर्षाचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम याच वर्षात सुरू होत आहे. हा अभ्यासक्रमाचे नियोजन आर्किटेक्ट इंजिनियर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), पुणे सिव्हील इंजिनियरिंग रिसर्च फौंडेशन (पीसीईआरएफ) आणि रोहन बिल्डर्स यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

त्याची सुरुवात या संदर्भातील सामंजस्य करार 'एसा'च्या ५५ वर्षपूर्तीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात करण्यात आली. त्यावेळी बीएनसीएचे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप यांच्यासह 'एसा'चे प्रेसिडेंट आर्किटेक्ट राजीव राजे, चेअरमन अर्किटेक्ट महेश बांगड, सेक्रेटरी निनाद जोग, तसेच जयदीप राजे, इंजिनियर जयंत इनामदार, रोहन बिल्डर्सचे अभिषेक भटेवरा, पीसीईआरएफचे मानस सचिव आर्किटेक्ट शिरीष केंभवी, इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्चरचे अध्यक्ष अर्किटेक्ट विलास अवचट, या अभ्यासक्रम उपक्रमाच्या संचालक डॉ. वैशाली अनगळ आणि समन्वयक अर्किटेक्ट पूजा घोरपडे हे मान्यवर उपस्थित होते. या अभ्यासक्रमाच्या निमित्ताने झालेल्या शुभारंभ सोहळ्यात बांधकाम क्षेत्रातील सुमारे ३०० बहुशाखीय व्यवसायिकांनी हजेरी लावली. सामंजस्य कराराबाबत बोलताना डॉ. कश्यप म्हणाले की, बीएनसीएच्या प्रवासातील हा एक नवीन टप्पा असून नवोन्मेष, सहकार्य आणि बांधकाम उद्योगाशी निगडीत शिक्षणाबाबतची आमची बांधिलकी अधोरेखित करतो.

# ५ हजार प्राध्यापकांच्या भरतीला लागला मुहूर्त

**छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील अनुदानित महाविद्यालयातील ५ हजार १२ प्राध्यापकांच्या भरतीला अखेर मुहूर्त मिळाला आहे. प्रत्येक अनुदानित महाविद्यालयांमध्ये रिक्त पदांच्या तुलनेत भरण्यात येणाऱ्या जागांचा तपशील मंगळवारी मध्यरात्रीपर्यंत विभागीय सहसंचालक कार्यालयांकडून मेलद्वारे महाविद्यालयांना कळविण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. राज्य शासनाने उच्च शिक्षण विभागाअंतर्गत अनुदानित १ हजार १७७ महाविद्यालयांतील १ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या विद्यार्थी संख्येच्या आधारे रिक्त प्राध्यापकांपैकी ५ हजार १२ पदांच्या भरतीसाठी मान्यता देण्याचा निर्णय घेतला होता.

# विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेची जागरूकता ९० टक्क्यांपर्यंत

*क्विक हील फाउंडेशनचा उपक्रम; ८० लाखांहून अधिक लोकांपर्यंत प्रभाव*



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडच्या CSR उपक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबतची जागरूकता जवळपास ९० टक्क्यांपर्यंत वाढल्याचे समोर आले आहे. या उपक्रमाचा प्रभाव देशभरातील ८० लाखांहून अधिक लोकांपर्यंत पोहोचला आहे.

फाउंडेशनने 'Cyber Shiksha for Cyber Suraksha: Future Proof 2025-26' हा पहिला प्रभाव मूल्यांकन अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालासाठी १०.४ लाख विद्यार्थ्यांचा सर्वेक्षण करण्यात आला असून, त्यातील २.१८ लाख प्रतिसादांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. हा सर्वे महाराष्ट्र व कर्नाटकातील ३२ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आला.

अहवालानुसार, कार्यक्रमानंतर सायबर जागरूकतेत लक्षणीय वाढ झाली असून, इयत्ता ५ ते ७ मधील विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता ४३ टक्क्यांवरून ८९ टक्क्यांपर्यंत, इयत्ता ८ ते १० मध्ये ४९ टक्क्यांवरून ९० टक्क्यांपर्यंत, तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये ४३ टक्क्यांवरून ९० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. तसेच १० पैकी ८ विद्यार्थ्यांनी सुरक्षित ऑनलाइन वर्तन स्वीकारण्याची तयारी दर्शवली आहे. सुरक्षित डिजिटल सवयींच्या अंगीकारातही वाढ दिसून आली असून, इयत्ता ५ ते ७ मध्ये ३९ टक्क्यांवरून ८४ टक्के, इयत्ता ८ ते १० मध्ये ३९ टक्क्यांवरून ८२ टक्के, तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये २६ टक्क्यांवरून ८९ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. डिजिटल लवचिकतेतही मोठी सुधारणा झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना 'सायबर वॉरियर्स' म्हणून तयार करण्यात येत असून, Earn & Learn मॉडेलद्वारे ते इतरांमध्ये सायबर सुरक्षा जागरूकता निर्माण करतात. तसेच नेतृत्व, संवादकौशल्य, टीमवर्क आणि प्रकल्प व्यवस्थापन यांसारख्या कौशल्यांचा विकासही केला जातो.

क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी सांगितले की, "या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाबरोबरच त्यांच्या वर्तनामध्येही सकारात्मक बदल झाला आहे. सुरक्षित डिजिटल भारत घडवण्यासाठी युवकांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे."

उपक्रमांतर्गत ५,१६९ जागरूकता सत्रांद्वारे ३६ शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यक्रम राबविण्यात आला असून, या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश पोहोचविण्यात आला आहे.

# श्रीराम-हनुमान जन्मोत्सवानिमित्त ब्राम्हणवाडा गावात धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी!

**ब्राम्हणवाडा येथे धार्मिक वातावरणात सांस्कृतिक जल्लोष; २ व ३ एप्रिलला लावणी कार्यक्रम!**



**ब्राम्हणवाडा : (समर्थ गांवकरी)**

श्रीराम-हनुमान जन्मोत्सवा निमित्त अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यासह २५ मार्च ते २ एप्रिल दरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

विठ्ठल-रुक्मिणी देवस्थान ट्रस्ट, ब्राम्हणवाडा यांच्या वतीने यात्रोत्सवानिमित्त देणगी संकलनाचे काम सुरू असून ग्रामस्थ, मुंबईकर व पुणेकर मंडळींकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. तुकाई देवी, देवी आई, राणुबाई, खोकल्या आई तसेच सर्व ग्रामदेवतांच्या यात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यात्रेनिमित्त हिंदी-मराठी गाण्यांचा बहारदार ऑर्केस्ट्रा तसेच सलग दोन दिवस लावणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दिनांक २ एप्रिल २०२६ रोजी रात्री ९ वाजता महाराष्ट्रातील डान्सिंग क्वीन सायली पाटील यांचा विशेष कार्यक्रम होणार आहे, तसेच शुक्रवार दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी रात्री ९ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लावणी सम्राज्ञी व सिने अभिनेत्री जुई शेरकर यांचा बहारदार लावणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या दोन्ही कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. या यात्रेचे निमंत्रक म्हणून विठ्ठल रुक्मिणी देवस्थान ट्रस्ट, यात्रा कमिटी, समस्त ग्रामस्थ ब्राम्हणवाडा तसेच मुंबईकर व पुणेकर मंडळी कार्यरत असून धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

# गडकरींनी ओढला राम रथ

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

उपराजधानीचे मुख्य श्रद्धास्थान असलेल्या पोद्दारेश्वर राम मंदिराच्या भव्य आणि ऐतिहासिक शोभायात्रेला आज 'जय श्रीराम'च्या जयघोषात सुरुवात झाली. या परंपरेचे यंदा ६० वे वर्ष असून, संपूर्ण नागपूर शहर भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी स्वतः राम रथ ओढून या सोहळ्याचा शुभारंभ केला. या भव्य शोभायात्रेच्या नियोजनासाठी शहरातील २८०० संस्थांचे तब्बल २४ हजार कार्यकर्ते सेवा देत आहेत. रस्त्यावरील शिस्त आणि भाविकांची सोय पाहण्यासाठी २ हजार रामभक्तांवर विशेष जबाबदारी सोपवण्यात आली आहे. यंदाच्या शोभायात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे शस्त्र-शास्त्रांनी सुसज्ज असलेला प्रभू श्रीरामाचा रथ.

# विवोचे Y21 5G आणि Y11 5G लाँच

**6500mAh बॅटरी व मिलिटरी-ग्रेड टिकाऊपणा**

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

विवो इंडियाने आपल्या Y सीरिजचा विस्तार करत नवीन Vivo Y21 5G आणि Vivo Y11 5G हे स्मार्टफोन्स भारतीय बाजारात सादर केले आहेत. दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, मजबूत टिकाऊपणा आणि 5G परफॉर्मन्स लक्षात घेऊन हे दोन्ही डिव्हाइस डिझाइन करण्यात आले आहेत. या स्मार्टफोन्समध्ये 6500mAh क्षमतेची मोठी बॅटरी देण्यात आली असून, दिवसभर वापरासाठी ते सक्षम आहेत. कंपनीच्या माहितीनुसार, या बॅटरीवर 48 तासांपर्यंत व्हिडिओ प्लेबॅक, 80 तासांपर्यंत म्युझिक प्लेबॅक आणि 33 तासांपर्यंत सोशल मीडिया वापर शक्य आहे. टिकाऊपणाच्या दृष्टीने दोन्ही डिव्हाइसेस SGS 5-स्टार ड्रॉप रेसिस्टन्स आणि मिलिटरी-ग्रेड सर्टिफिकेशनसह येतात. IP65 रेटिंगमुळे धूळ आणि पाण्यापासूनही संरक्षण मिळते. परफॉर्मन्ससाठी




MediaTek Dimensity 6300 प्रोसेसर देण्यात आला असून, 5G कनेक्टिव्हिटीसह स्थिर आणि स्मूथ अनुभव मिळतो. OriginOS 6 मुळे वापरकर्ता अनुभव अधिक सुलभ आणि जलद होतो. दोन्ही स्मार्टफोन्समध्ये 6.74-इंच HD+ डिस्प्ले आणि 120Hz रिफ्रेश रेट देण्यात आला आहे, ज्यामुळे स्क्रोलिंग आणि व्हिज्युअल्स अधिक स्मूथ दिसतात. 1200 nits ब्राइटनेस आणि TÜV Rheinland लो ब्लू लाईट सर्टिफिकेशनमुळे डोळ्यांना आरामदायी अनुभव मिळतो.


चार्जिंगच्या बाबतीत Vivo Y21 5G मध्ये 44W फास्ट चार्जिंग तर Y11 5G मध्ये 15W चार्जिंग सपोर्ट आहे. याशिवाय, दोन्ही डिव्हाइसेसमध्ये 5 वर्षांची बॅटरी हेल्थ गॅरंटी देण्यात आली आहे.

Vivo Y21 5G – ₹18,999 ते ₹22,999 (व्हेरिएंटनुसार)
Vivo Y11 5G – ₹14,999 ते ₹16,999

दोन्ही स्मार्टफोन्स Vivo ई-स्टोअर, Flipkart आणि अधिकृत रिटेल स्टोअर्सवर उपलब्ध आहेत. ग्राहकांना कॅशबॅक, झिरो डाउन पेमेंट आणि Jio OTT फायदे यांसारख्या लॉन्च ऑफर्सचाही लाभ मिळणार आहे.

# स्पिडब्रेकर मुळे ऑटो पलटी तीघे जखमी

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**



भोकर ते नांदेडकडे जात असतांना बारसगाव पाटीजवळ स्पीड ब्रेकर मुळे ऑटो पलटी होऊन झालेल्या भीषण अपघातात तीघे जखमी झाले असून त्यापैकी एक महिला गंभीर जखमी आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दि.२६ गुरुवार रोजी सायंकाळी भोकरहून नांदेडच्या दिशेने जात असताना बारसगाव पाटीजवळ रस्त्यावर असलेल्या गतीरोधक मुळे वेगात असलेल्या ऑटो चालकाचा ताबा सुटल्याने ऑटो पलटी होऊन अपघात झाला. घटनेची माहिती मिळताच जगद्गुरु नरेंद्रचार्य महाराज संस्थानच्या रुग्णवाहिकेचे चालक राजू पाचंगे यांनी क्षणाचाही विलंब न लावता घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने अर्धापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. जखमींपैकी सय्यद नौसीन सय्यद महीमोद्दीन वय २०, सय्यद सखीना बेगम मोहीम्मोद्दीन वय ४४, सय्यद आफताब मोईमोद्दीन वय १९ सर्व रा.जेईनुर ता.जि.असिफाबाद येथील असुन त्यांना नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. यापैकी नौसीन सय्यद महीमोद्दीन यांना गंभीर दुखापत झाली असल्याचे वैद्यकीय सूत्रांकडून समजते. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

# शाश्वत भविष्याला चालना देण्यासाठी जॅक्सन ग्रुपची सौरव गांगुलीसोबत भागीदारी

**नेतृत्व अधिक भक्कम करण्यासाठी आणि शाश्वत विकासाला**




**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

भारतातील आघाडीची ऊर्जा आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील कंपनी जॅक्सन ग्रुपने आज भारताच्या क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि प्रख्यात नेतृत्व सौरव गांगुली यांच्यासोबत धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली. भारत वेगाने आपल्या अक्षय ऊर्जेच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याच्या दिशेने पुढे जात असताना ही भागीदारी झाली आहे. नाविन्य, व्याप्ती आणि शाश्वत उपायांद्वारे देशाच्या ऊर्जा संक्रमणाला चालना देण्याच्या जॅक्सनच्या कटिबद्धतेला यामुळे अधिक बळकटी मिळते. आठ दशकांहून अधिक काळाचा वारसा असलेल्या जॅक्सन ग्रुपने नेहमीच विश्वास, लवचिकता आणि भविष्याचा वेध घेणाऱ्या नाविन्यपूर्णतेला प्राधान्य दिले आहे. गांगुली यांचे परिवर्तनशील नेतृत्व आणि नवे मापदंड प्रस्थापित करण्याच्या त्यांच्या क्षमतेतून प्रेरणा घेत, कंपनीचे उद्दिष्ट भविष्यवेधी ऊर्जा आणि पायाभूत सुविधांचे उपाय स्पष्टपणे आणि उत्कृष्टपणे अंमलात आणणारा एक विश्वासार्ह भागीदार म्हणून आपले स्थान अधिक मजबूत करणे हे आहे.

या भागीदारीचा एक भाग म्हणून, सौरव गांगुली जॅक्सन ग्रुपच्या प्रमुख ब्रँड मोहिमा आणि धोरणात्मक उपक्रमांचे प्रतिनिधित्व करतील, तसेच अधिक स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जा परिसंस्था निर्माण करण्याच्या कंपनीच्या दृष्टिकोनाचा विस्तार करतील. या भागीदारीबद्दल बोलताना, जॅक्सन ग्रुपचे अध्यक्ष श्री. समीर गुप्ता म्हणाले, "जॅक्सन कुटुंबात 'दादा'चे स्वागत करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. सौरव गांगुली हे नेतृत्व, चिकाटी आणि उत्कृष्ट कामगिरीचे प्रतीक आहेत - हीच मूल्ये आमच्यातही रुजलेली आहेत. नेहमी पुढे राहण्याच्या आणि सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करण्याच्या आमच्या समान विचारधारेचे हे भागीदारी एक प्रतिबिंब आहे. त्यांच्या विश्वासार्हतेमुळे, आम्हाला खात्री आहे की ही भागीदारी आमचा ब्रँड मजबूत करेल आणि भारतभर तसेच जागतिक स्तरावर आमच्या शाश्वत उपायांचा अवलंब करण्यास गती देईल." ते पुढे म्हणाले, "आमची प्रगती मजबूत नेतृत्वावर आधारलेली आहे, ज्याला आमचे उपाध्यक्ष श्री. संदीप गुप्ता, जॅक्सन ग्रीनचे उपाध्यक्ष आणि ग्लोबल सीईओ श्री. बिकेश ओग्रा, आणि ग्रुपला पुढे नेणाऱ्या नव्या पिढीची खंबीर साथ आहे."

या भागीदारीवर भाष्य करताना श्री. सौरव गांगुली म्हणाले, "वितरित वीज, सौर ऊर्जा, ग्रीन मॉलिक्यूल्स आणि पायाभूत सुविधा - वीज, मेट्रो, नागरी आणि पाणी या संपूर्ण मूल्य साखळीवर जॅक्सनचा दृष्टिकोन अत्यंत वेळेवर आणि प्रभावी आहे. भारताच्या ऊर्जा संक्रमण आणि हरित भविष्यासाठी अर्थपूर्ण योगदान देणाऱ्या ब्रँडशी जोडले जाण्यासाठी मी खूप उत्सुक आहे."

हा उपक्रम जॅक्सनच्या उत्पादन, प्रकल्प विकास, EPC आणि O&M सेवांपर्यंत विस्तारलेल्या अद्वितीय एकात्मिक व्यवसाय मॉडेलला अधिक बळकटी देतो. आपल्या विकास धोरणाशी सुसंगत राहून, कंपनी दीर्घकालीन शाश्वततेसाठी लोक आणि तंत्रज्ञान यावर लक्ष केंद्रित करत आहे. आठ दशकांहून अधिक काळाचा वारसा असलेला जॅक्सन ग्रुप, नाविन्य, ग्राहकांना प्राधान्य देणारा दृष्टिकोन आणि स्वच्छ भविष्य घडवण्याच्या दृढ संकल्पाच्या मार्गदर्शनाखाली, भारताच्या विकसित होत असलेल्या ऊर्जा आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

# चेटीचंड महोत्सवातून सिंधी संस्कृती, सामाजिक एकतेचे दर्शन

## सिंधू सेवा दलातर्फे भगवान साई झुलेलाल यांचा १०७६ वा जन्मोत्सव व सिंधी नववर्षाचा आनंदोत्सव साजरा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

'आयो लाल झुलेलाल'च्या जयघोषात भगवान साई झुलेलाल यांची भक्तीभावाने केलेली आरती... झुलेलाल यांच्या मनमोहक प्रतिमेचे पूजन... सिंधी गीतांची बहारदार मैफल... कलात्मक नृत्याविष्कार... चाट-सामोसा-गोड भाताचा प्रसाद... रुचकर लंगर... डोक्यावर लाल टोपी आणि साई झुलेलाल यांचे 'लाल झुले लाल झुले लाल झुलेलाल' हे अखंड भजन अशा भावभक्तीमय वातावरणात सिंधी संस्कृतीचे दर्शन घडले. पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील ५००० पेक्षा अधिक आबालवृद्धांनी या महोत्सवात सहभागी होत सिंधी समाजाच्या एकतेचे दर्शन घडवले.



सिंधी समाजाचे नवीन वर्ष व भगवान साई झुलेलाल यांच्या १०७६ व्या जन्मोत्सवानिमित्त सिंधू सेवा दलातर्फे 'चेटीचंड' महोत्सव आयोजिला होता. येरवड्यातील डेक्कन कॉलेजच्या बँक्वेट हॉल व मैदानावर झालेल्या या महोत्सवात सहभागी प्रत्येक सिंधी बंधू-भगिनींच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. भगवान साई झुलेलाल यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामाजिक आणि सांस्कृतिक महोत्सवाची सुरुवात झाली. संगीत, गायन, भजन आणि महाप्रसादातील विविध पदार्थ आणि खास महिलांचाच सहभाग असलेल्या म्युझिक बँडचे सादरीकरण यामुळे यंदाचा चेटीचंड महोत्सव वैशिष्ट्यपूर्ण ठरला. गायिका, वादक, कीबोर्ड प्लेयर, ड्रमर अशा प्रत्येक भूमिकेत महिला कलाकारांनी आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवत 'नारी शक्ती'चा प्रभावी आविष्कार घडवला.

विविध शहरातील १६ सिंधी महिला कलाकारांनी एकत्र येऊन हा म्युझिक बँड सुरु केलेला असून, महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने त्यांना सांस्कृतिक सादरीकरणाची संधी देण्यात आली. सिंधी ऑर्केस्ट्राचा लाईव्ह कॉन्सर्ट उपस्थितांनी अनुभवला. जनरेशन नेक्स्ट डान्स अकादमीतर्फे आकर्षक नृत्यकलेचे सादरीकरण झाले. प्रीतिभोजने (महाप्रसाद) महोत्सवाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध सिंधी स्टँड-अप कॉमेडियन आणि अभिनेता मोहित शेवानी यांनी केले. त्यांच्या प्रभावी शैलीने कार्यक्रमात रंगत आणली.


न्यूज १८ चे व्यवस्थापकीय संचालक किशोर आजवानी यांच्या हस्ते साई झुलेलाल यांची महाआरती झाली. उद्योजक मनोज मोटवानी यांचा विशेष गौरव करण्यात आला.

यावेळी सिंधू सेवा दलाचे अध्यक्ष सचिन तलरेजा, माजी अध्यक्ष सुरेश जेठवानी, अशोक वासवानी, दीपक वाधवानी, विजय दासवानी, सचिव राजेंद्र फेरवानी, खजिनदार जय पिंजानी, जनसंपर्क अधिकारी देवेंद्र चावला आदी उपस्थित होते.

सचिन तलरेजा म्हणाले, "सिंधी संस्कृती विषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासह सिंधी परंपरा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी सिंधू सेवा दल गेली ३९ वर्ष कार्यरत आहे. चेटीचंड महोत्सवानिमित्त सर्व समाज एकत्र येतो. भगवान साई झुलेलाल यांचा उत्सव साजरा करतो. हा आनंदाचा क्षण अनुभवण्यासाठी आम्हीही दरवर्षी यामध्ये सहभागी होतो."

# अनिल मंद्रूपकर यांना 'अटल राष्ट्र सेवा पुरस्कार'

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



सामाजिक कार्यकर्ते लायन अनिल मंद्रूपकर यांना देशभरातील सहा राज्यांमध्ये ४७ वर्षे केलेल्या सामाजिक कार्याबद्दल राष्ट्रीय स्तरावरील 'अटल राष्ट्र सेवा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. नवी दिल्ली येथील तालकटोरा स्टेडियममध्ये माजी केंद्रीय मंत्री डॉ. मुरली मनोहर जोशी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. देशभरातील विविध क्षेत्रांतील ५० जणांना यावेळी सन्मानित करण्यात आले. राष्ट्रकवी दिवंगत रामधारी सिंह 'दिनकर' स्मृती न्यास, नवी दिल्ली यांच्या वतीने माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार स्थापित करण्यात आला आहे.

मंद्रूपकर यांनी १९७९ मध्ये गुजरातमधील मोरबी पूरग्रस्तांसाठी निधी संकलन करून सामाजिक कार्याची सुरुवात केली. त्यानंतर युवक बिरादरी, लायन्स इंटरनॅशनल, वनराई, डॉ. ज्ञानेश्वर मुळ्ये फाउंडेशन, एकलव्य, आशीर्वाद वृद्धाश्रम, स्नेहक्षितिज मेंटल रिहॅबलिटेशन, लेकटाऊन सोसायटी, विश्वेश्वर एम्पॉवरमेंट विविध सामाजिक संस्था तसेच स्वयंसेवी संघटनांच्या माध्यमातून त्यांनी सातत्याने काम केले.

कमिन्स इंडियामध्ये चार दशकांच्या कार्यकाळातही त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली. पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी २००६ मध्ये पुण्यात 'इको फ्रेंड्स' लायन्स क्लबची स्थापना केली. स्वच्छ भारत अभियानांतर्गत ग्रामीण भागात शौचालय उभारणी, स्वच्छता मोहिमा तसेच '३आर' तत्त्वांवर आधारित उपक्रम राबविले. आर्वी गावात उभारलेल्या शौचालय प्रकल्पासाठी राष्ट्रपती पुरस्कारही मिळाला आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षण व रोजगारासाठी मदत, विविध सामाजिक संस्थांना सहकार्य आणि सातत्यपूर्ण समाजकार्य ही त्यांची ओळख ठरली आहे. मंद्रूपकर यांनी या सन्मानाबद्दल सर्व सहकारी, संस्था आणि मित्रांचे आभार मानत 'विकसित भारत'साठी कार्य सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# घरफोडी, ३ लाख ९६ हजारांचे सोन्याचे दागिने लंपास



**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड तालुक्यातील वाघा येथे दि २५ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी ३ लाख ९६ हजारांचे सोन्या चांदीचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी अज्ञात चोरट्या विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जामखेड तालुक्यातील वाघा याठिकाणी फीर्यादी आकाश रामदास बारस्कर वय २६ वर्षे हे आपल्या आई वडीलांसह घरातील एका हॉलमध्ये झोपले होते. यावेळी दि. २५ मार्च रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश केला व फीर्यादी झोपलेल्या हॉलची बाहेरुन कडी लावुन घेतली होती. यानंतर या चोरट्यांनी फीर्यादीच्या कीचनच्या दरवाज्याचा कडीकोंडा तोडुन आत प्रवेश केला. तसेच कीचन मधिल कपाटाची उचका पाचक करुन कपाटात ठेवलेले सोन्याचे मणीगंठन, सोन्याची अंगठी, सोन्याची चैन, कर्णफुले, नथ, बोरमाळ, गंठण, बदाम पेटी, कानातील वेल सोन्याची नथ, सुट्टे मनी, कानातील झुबे व चांदीचे काही दागीने असा एकुण ३ लाख ९६ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला व चोरटे पसार झाले.

पहाटे फीर्यादीचे वडील हे लघुशंकेला उठले असता हॉलची चोरट्यांनी बाहेरुन कडी लावलेली लक्षात आले. यानंतर किचन मध्ये ठेवलेल्या सोन्या चांदीचे दागिने चोरीला गेले असल्याचे लक्षात आले. या चोरी प्रकरणी फीर्यादी आकाश रामदास बारस्कर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जामखेड पोलीस स्टेशनला अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळी फॉरेन्सिक टीम दाखल झाली होती. तसेच कर्जत जामखेड चे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद लोखंडे व जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी घटनास्थळी भेट दिली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संपत कन्हेरे हे करित आहेत.

# पाणीटंचाई यंदा भासणार

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

माणिकडोह धरणात आजची टक्केवारी २७ .९० आहे .धरणाची पातळी खोल आहे . यामुळे मुक्या जनावरांना व शेतीच्या पिकांना पाणीटंचाई लवकरच यंदा भासणार अशी चर्चा आदिवासी बांधवांमध्ये सुरू आहे. येथील आदिवासी बांधव १००% काबाडकष्ट व रोजंदारीवर अवलंबून आहे. स्वातंत्र्य काळापासून येथील आदिवासी बांधवांची पाणी प्रश्न सुटला नाही. तहसीलदार बाळासाहेब सिरसट व गटविकास अधिकारी प्रतीक चन्नावर यांनी आदिवासी भागातील गावांची ताबडतोब पाणी संदर्भात ग्रामपंचायत कार्यालय व ग्रामस्थांन मार्फत मीटिंग चे आयोजन करून टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी नियोजन करणे गरज आहे .

# एअरबीएनबीने 'इव्हेंट टुरिझम' केंद्र म्हणून होत असलेली वाढ केली अधोरेखित

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

एअरबीएनबीचा अलीकडेच प्रकाशित झालेला अहवाल 'अनलॉकिंग महाराष्ट्र इव्हेंट इकॉनॉमीः पॉवरिंग टुरिझम अँड लोकल कम्युनिटीज' मध्ये अधोरेखित करण्यात आले की प्रवासाला वाढत्या प्रमाणात अनुभवांमुळे चालना मिळत असल्याने महोत्सव, क्रीडा कार्यक्रम आणि सांस्कृतिक उत्सव महाराष्ट्रभर पर्यटनाची मागणी आणि पर्यटकांच्या खर्चाला वेग देत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र भारतातील कार्यक्रमकेंद्री प्रवासाचे प्रमुख केंद्र बनले आहे.

राज्यभरात मोठ्या प्रमाणावरील उपक्रमांमुळे पर्यटकांमध्ये मोठी वाढ होऊ लागली आहे. २०२३ मधील विश्वचषक सामन्यांदरम्यान, महाराष्ट्रात राहिलेल्या पाहुण्यांमध्ये वार्षिक स्तरावर ५० टक्के वाढ झाली. त्याचबरोबर सामन्याच्या तारखांदरम्यान पर्यटकांच्या चेक-इनमध्ये ७५ टक्के वाढ झाली. तसेच जानेवारी २०२५ मध्ये मुंबईतील कोल्डप्लेच्या कार्यक्रमादरम्यान बुकिंगमध्ये १०० टक्के वाढ झाली आणि मैफिलीच्या तारखांदरम्यान पाहुण्यांच्या संख्येत १७० टक्के वाढ झाली. पर्यटकांनी या क्षणांचे ट्रिप्समध्ये रूपांतर केले. हा कल पुढे लोलापलूझा इंडिया २०२६ सारख्या उत्सवांमध्ये प्रतिबिंबित झाला, जिथे मुंबईतील बुकिंगमध्ये वार्षिक स्तरावर ५० पेक्षा जास्त वाढ झाली आहे. जानेवारीमधील सर्व बुकिंगपैकी ८० टक्क्यांपेक्षा जास्त बुकिंग महोत्सवाच्या आठवड्यात होते. अलीकडील सर्वेक्षणानुसार, तरुण भारतीय कार्यक्रमावर आधारित प्रवासावर अधिकाधिक खर्च करत आहेत. त्यातील प्रत्येक ट्रिपमध्ये सामान्यतः ५१,००० रुपये खर्च करतात आणि दहापैकी सहा प्रवासी त्यांच्या मासिक उत्पन्नाच्या २१-४० टक्के संगीतावर आधारित प्रवासावर खर्च करतात. कॉन्सर्टच्या तिकिटावर खर्च केलेल्या प्रत्येक एक हजार रूपयांमागे अतिरिक्त १५०० – २००० रूपये पर्यटन अर्थव्यवस्थेत, निवास, वाहतूक आणि स्थानिक व्यवसायांमध्ये विभाजित होतात. एअरबीएनबीवरील खर्चाने २०२५ मध्ये भारताच्या अर्थव्यवस्थेत ८३.२ कोटी डॉलर्सपेक्षा जास्त योगदान दिले आणि विविध क्षेत्रांमध्ये २,२२,००० रोजगार निर्माण केले.

एअरबीएनबीचे भारत आणि आग्नेय आशियाचे राष्ट्रीय प्रमुख अमनप्रीत बजाज म्हणाले, "कार्यक्रम वाढत्या प्रमाणात लोकांच्या प्रवास करण्याच्या पद्धतीला आकार देत आहेत आणि हे कसे दीर्घकाळ टिकते आणि अधिक स्थानिक आर्थिक घडामोडींमध्ये रूपांतरित होते हे महाराष्ट्र अनुभवतो आहे. "राज्य मोठ्या प्रमाणावरील कार्यक्रमांना आकर्षित करत असल्याने पर्यटकांच्या मागणीला पाठिंबा देण्यासाठी आणि अधिकाधिक समुदायांना पर्यटनाच्या वाढीत सहभागी होण्यासाठी व त्याचा लाभ घेण्यासाठी पुरेशी निवास व्यवस्था शक्य करणे महत्त्वाचे ठरेल.

# निष्क्रिय इच्छामृत्यूवर आधारित अंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेता 'मर्सी'ची झलक येतेय!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

जागतिक चित्रपट महोत्सवांमध्ये प्रशंसा मिळवल्यानंतर, चित्रपट 'मर्सी' ची पहिली अधिकृत झलक 27 मार्चला चित्रपटगृहांमध्ये दाखवली जाते, विशेषतः 'धुरंधर: द रिवेंज' सोबत.

हा चित्रपट निष्क्रिय इच्छामृत्यु (Passive Euthanasia) सारख्या संवेदनशील विषयावर आधारित आहे आणि एका कुटुंबाच्या भावना, जबाबदा-या आणि कठीण निर्णयांची सखोल पडताळणी करतो. कथा दाखवते की जीवनाच्या अंतिम टप्प्यात येणाऱ्या आव्हानांमध्ये कुटुंब कसे भावनिक आणि कायदेशीर गोंधळांचा सामना करते. अभिनेता राज वासुदेवा यांनी सांगितले : "मर्सी माझ्यासाठी अत्यंत खास चित्रपट आहे. ही एका कुटुंबाची ताकद आणि प्रेमाची कथा आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेली प्रशंसा पाहून खूप आनंद झाला. आता मी इच्छितो की प्रेक्षक ही कथा अनुभवावेत."




आदिल हुसैन यांनी शेअर केले : "मर्सी केवळ चित्रपट नाही, तर मानवता आणि सन्मानाची कथा आहे. मिळालेली प्रशंसा हे सिद्ध करते की खरी कथा प्रत्येकापर्यंत पोहोचते."

दिग्दर्शक मितुल पटेल यांनी सांगितले : "अशी कथा बनवणे माझ्यासाठी मोठी जबाबदारी होती. आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेली प्रशंसा आमच्यासाठी खूप खास आहे, पण खरी महत्त्वाची गोष्ट या चित्रपटाच्या संदेशात आहे. देशात प्रदर्शित होण्यास अत्यंत उत्साहित आहे."

चित्रपटाला आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार मिळाले आहेत: लंडन इंडिपेंडेंट इंटरनेशनल फिल्म फेस्टिव्हल – बेस्ट इंटरनेशनल फीचर फिल्म जयपूर इंटरनेशनल फिल्म फेस्टिव्हल (JIFF) – राज वासुदेवा (बेस्टअभिनेता), मितुल पटेल (बेस्ट डेब्यू डायरेक्टर) इतर महोत्सव: शिकागो साउथ आशियन फिल्म फेस्टिव्हल, यूके आशियन फिल्म फेस्टिव्हल (लंडन), स्टुटगार्ट इंडियन इंटरनेशनल फिल्म फेस्टिव्हल

मुख्य कलाकार: आदिल हुसैन, राज वासुदेवा, निहारिका रायजादा. अपर्णा घोषाल आणि कुणाल भान यांनी चित्रपटाला आणखी प्रभावी बनवले आहे.

# भव्य सूर्यनमस्कार स्पर्धा संपन्न

**वडाळा महादेव : (समर्थ गांवकरी)**

दि आर्ट ऑफ लिविंग संस्थेच्या प्रोजेक्ट भारत अंतर्गत तसेच श्री श्री रविशंकर विद्या मंदिर श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने रामनवमी उत्सवानिमित्ताने तसेच श्री श्री रविशंकर जी यांच्या ७० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने अहिल्यानगर शहरातील सावेडी येथील गावडे मळ्यात श्री श्री रविशंकर जी यांचे ध्यान मंदिर असून त्या ठिकाणी नगर शहरातील वेगवेगळ्या शाळेतील एकूण ७१ विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार स्पर्धेत सहभाग घेऊन राम जन्म विषयी व सूर्य विषयी कृतज्ञता व्यक्त केली श्री श्री रविशंकर विद्या मंदिर शाळेचे संस्थापक अध्यक्ष संदीप कसार सर यांनी सर्व स्पर्धकांना योगा प्राणायाम ध्यान व सूर्यनमस्काराचे प्रात्यक्षिक करून सर्व स्पर्धकांची शास्त्रशुद्ध पद्धतीने सूर्यनमस्कार करत स्पर्धा घेतली विजय स्पर्धकांना संस्थेच्या वतीने सुवर्णपदक देण्यात आले.

# सध्याचा काळ मानवी मूल्यांची कसोटी पाहणारा

## डॉ. श्रीपाल सबनीस यांचे प्रतिपादन; एकदिवसीय विश्वशांती परिषदेचे पुण्यात आयोजन

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

"जागतिक स्तरावर निर्माण झालेली युद्धजन्य परिस्थिती ही केवळ सीमारेषांपुरती मर्यादित नसून, ती मानवतेच्या मुळावर आघात करणारी आहे. हा केवळ राजकीय, सामाजिक संघर्षाचाच नाही, तर मानवी मूल्यांची कसोटी पाहणारा काळ आहे," असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व माजी संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.




भगवान महावीर एज्युकेशन सोसायटी व सहकारी संस्थांच्या वतीने आयोजित विश्वशांती परिषदेत डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते. टिळक रस्त्यावरील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पटवर्धन सभागृहात आयोजित विश्वशांती परिषदेचे उद्‌घाटन सरहद संस्थेचे अध्यक्ष संजय नहार यांच्या हस्ते झाले. प्रसंगी भगवान महावीर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. अशोककुमार पगारिया, झेन मास्टर भन्ते सुदर्शन, फादर अँटोन डिसोझा, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यवाह अंजली कुलकर्णी, मुलनिवासी मुस्लिम मंचाचे अध्यक्ष अंजुम इनामदार, विचारवंत सरदार पदमसिंग, प्रीतम प्रकाश महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सदाशिव कांबळे, माता रमाई प्रतिष्ठानचे विठ्ठल गायकवाड, ज्ञान फाउंडेशनचे मनोहर कोलते, सुसंगत फाउंडेशनचे डॉ. सुधाकर न्हाळदे, अभय छाजेड, राजेंद्र धोका, शैलेश पगारिया, राजेंद्र सुराणा, श्रीपाल ललवानी व प्रितम प्रकाश महाविद्यालयामधील कर्मचारी वर्ग उपस्थित होता. डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, "युद्धाची सर्वाधिक झळ निरपराध नागरिकांनाच बसते. महिला, बालक आणि दुर्बल घटक यांचे दुःख कोणत्याही विजयापेक्षा मोठे असते. धर्म कधीही हिंसेचे समर्थन करत नाही; युद्ध हे मानवी लोभ आणि सत्ताकांक्षेचे प्रतीक आहे. आजच्या राजकारणात डोनाल्ड ट्रम्प यांसारख्या ध्रुवीकरण करणाऱ्या नेतृत्वामुळे संघर्ष तीव्र होत आहेत. दोन बलाढ्य राष्ट्रांतील संघर्षाचे परिणाम अखेरीस संपूर्ण मानवजातीला भोगावे लागतात.

# Galaxy A57 5G आणि A37 5G भारतात लवकरच; AI फीचर्सवर भर

**गुरुग्राम : (समर्थ गांवकरी)**

सॅमसंग भारतात आपल्या नेक्स्ट-जनरेशन गॅलेक्सी A सिरीज स्मार्टफोन्स—Galaxy A57 5G आणि Galaxy A37 5G—लाँच करण्याच्या तयारीत आहे. हे दोन्ही स्मार्टफोन्स पुढील आठवड्यात बाजारात येण्याची शक्यता आहे.

या नवीन डिव्हाइसेसचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे कमी प्रकाशातही स्पष्ट फोटो आणि व्हिडिओ कॅप्चर करण्याची प्रगत कॅमेरा क्षमता असेल. यासोबतच, सॅमसंगकडून 'ऑसम इंटेलिजन्स' नावाची नवीन AI-आधारित फीचर्सही देण्यात येणार असल्याची माहिती आहे.

टिकाऊपणाच्या दृष्टीने Galaxy A57 5G आणि A37 5G हे IP68 रेटिंगसह येऊ शकतात, ज्यामुळे धूळ आणि पाण्यापासून संरक्षण मिळेल. तसेच, दीर्घकालीन सिक्युरिटी अपडेट्स आणि OS अपग्रेड्स ही सॅमसंगची खासियत या डिव्हाइसेसमध्येही कायम ठेवली जाणार आहे.

डेटा सुरक्षिततेसाठी दोन्ही स्मार्टफोन्समध्ये हार्डवेअर-आधारित Samsung Knox Vault तंत्रज्ञानाचा समावेश असणार आहे. याशिवाय, अपग्रेडेड प्रोसेसर्स, Wi-Fi 6E आणि Bluetooth 6 यांसारख्या आधुनिक कनेक्टिव्हिटी फीचर्सची अपेक्षा आहे.

सॅमसंगची गॅलेक्सी A सिरीज भारतातील सर्वाधिक लोकप्रिय स्मार्टफोन सिरीजपैकी एक असून, देशात याची जवळपास 100 दशलक्ष युनिट्स विक्री झाली आहे. किफायतशीर दरात प्रीमियम फीचर्स देण्याच्या धोरणाचा भाग म्हणून हे नवीन स्मार्टफोन्स बाजारात सादर केले जाणार आहेत.

# पालकत्व समृद्ध होण्यासाठी मुलांशी मैत्र जपणे गरजेचे

## मृदुला भाटकर यांचे प्रतिपादन; 'क्रिसेंट' तर्फे आयोजित एकल पालक संमेलन उत्साहात

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

"आईवडील हे मुलांचे काळजीवाहक, सेवादाते आणि संरक्षक असतात. त्यासोबतच त्यांना प्रेमाचा व मायेचा आधार हवा असतो. त्यामुळे पालकांनी मुलांशी मैत्र जपायला हवे. त्यातूनच पालकत्व अधिक समृद्ध होत जाते," असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश मृदुला भाटकर यांनी केले. एकल पालकत्व निभावताना मनाचा कणखरपणा खूप महत्वाचा असतो, असेही त्यांनी नमूद केले.




राष्ट्रीय एकल पालक दिवसाच्या (२१ मार्च) निमित्ताने क्रिसेंट म्युच्युअल फंड डिस्ट्रिब्युटर्सतर्फे आयोजित एकल पालक संमेलनात भाटकर बोलत होत्या. बीएमसीसी रस्त्यावरील दादासाहेब दरोडे सभागृहात आयोजित या संमेलनावेळी दीपस्तंभ फाउंडेशनचे संस्थापक यजुवेंद्र महाजन, कौटुंबिक न्यायालयातील ज्येष्ठ समुपदेशिका डॉ. स्मिता प्रकाश जोशी, राजेंद्र ततार, क्रिसेंट म्युच्युअल फंड डिस्ट्रिब्युटर्सचे संस्थापक दिनेश कोठावदे, संचालक भूषण वाणी आदी उपस्थित होते. संघर्षाला सामोरे जात आपल्याला मुलांना घडवणाऱ्या काही एकल पालकांचा विशेष सन्मान यावेळी करण्यात आला. मृदुला भाटकर यांनी एकल पालकत्वाच्या विविध पैलूंवर अत्यंत संवेदनशील आणि वास्तववादी दृष्टिकोन मांडला. त्या म्हणाल्या, "एकल पालकांना अनेक भावनिक, सामाजिक आणि आर्थिक आव्हानांना सामोरे जावे लागते; मात्र त्यातूनच शिकण्याची, स्वतःला सक्षम बनवण्याची संधीही मिळते. योग्य दृष्टिकोन, संयम आणि सकारात्मक विचारसरणी ठेवली, तर पालकत्व ताणतणावाचा विषय न राहता आनंददायी आणि समाधानकारक अनुभव ठरतो. पालकांनी मुलांची तुलना न करता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर करत त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. मुलांशी पालक म्हणून नव्हे, तर विश्वासू मित्र म्हणून नाते निर्माण करावे. विश्वास, संवाद आणि समजूतदारपणा या तीन गोष्टींवर पालक-मुलांचे नाते अधिक दृढ होते."

"समाज बदलतो, तसे कायदेही बदलत जातात. हे बदल समाजाच्या कल्याणासाठीच असतात. त्यामुळे एकल पालकांनी कायद्याबाबत जागरूक राहून आपल्या हक्कांची आणि जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. एखादी व्यक्ती वैवाहिक नात्यात अपयशी ठरली, तर ती पालक म्हणूनही अपयशी ठरेलच असे नाही. उलट, अनेकवेळा अशा व्यक्ती अधिक संवेदनशील आणि जबाबदार पालक म्हणून पुढे येतात," असेही त्यांनी नमूद केले. एकल पालकांशी थेट संवाद साधत भाटकर यांनी त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. मुलांच्या संगोपन, शिक्षण, मानसिक ताणतणाव, कुटुंबीय संबंध आणि कायदेशीर बाबींशी संबंधित प्रश्नांवर त्यांनी अत्यंत सोप्या आणि स्पष्ट भाषेत मार्गदर्शन केले. प्रत्येक प्रश्नाकडे त्यांनी सहानुभूतीने पाहत परिस्थितीनुसार व्यावहारिक उपाय सुचवले. त्यांच्या संवादात्मक शैलीमुळे उपस्थित पालकांना आपले प्रश्न मोकळेपणाने मांडण्याची संधी मिळाली. दिव्यांगांचे पालकत्व निभावताना याविषयीचे अनुभव सांगत यजुवेंद्र महाजन म्हणाले, "केवळ स्वतःसाठी जगणे म्हणजे मृत्यूसमान असून, इतरांसाठी निःस्वार्थपणे जगण्यातच खऱ्या अर्थाने जीवनाचे समाधान आहे. 'मानवसेवा हीच ईश्वरसेवा' हे जीवनाचे अंतिम ध्येय मानून माझ्या आयुष्याची दिशा समाजकार्यासाठी समर्पित केली. वैयक्तिक सुखांचा त्याग करून अनेक गरजू मुलांच्या आयुष्यात प्रकाश आणण्याचा प्रयत्न केला.